
# श्री साईलीला



गुरुपौर्णिमा अंक	किं. ५० पैसे	जुलै १९६५

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासु सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

## श्रीसाईलीला

या पृथ्वीच्या पाठीवर तुम्हीं कुठेंही असा. मी तुमच्या सांगाती सतत आहे ही भावना मनांत जागी असूं द्या. माझें वास्तव्य तुमच्या अंतःकरणांत आहे. तुमच्याहून मी वेगळा नाहीं मी तुमच्या अंतःकरणांत वास करीत असल्या-मुळें तुम्हांला कोणत्याही परिस्थितींत भिण्याचे मुळींच कारण नाहीं. माझ्यावर दृढ श्रद्धा ठेवा माझी मनोमन आठवण करा. तुम्हांला जो जो कोणी भेटेल त्याच्याठायींही माझें वास्तव्य आहे असें समजून त्याच्याशीं वागा. माणसेंच काय ? परंतु प्रत्येक लहान मोठ्या प्राण्यांत मी आहे. मी सर्वत्र आहे ही भावना जागृत ठेवा. भेदभाव बाळगूं नका. अशारीतीनें या जगांत जो वावरेल त्याच्या-सारखा भाग्यवंत तोच होय.

—श्रीसाईसच्चरित्

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४[illegible] वें ] जुलै १९६५ [ अंक ४ था

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

ईश्वरकृपेनें आम्हांला मनुष्य जन्म मिळाला तो कशासाठीं ? साधनेच्याद्वारा अधिकाधिक त्याच्या सन्निध जाण्यासाठीं; परंतु ही साधना साधीसुधी नाहीं. महत् प्रयासांनीं आपल्या अंतर्यामी आपले जे शत्रू दबा धरून बसले आहेत व जे वारंवार डोके वर करून आम्हांला आड मार्गांनें घेऊन जाण्यासाठीं टपलेले आहेत त्यांच्यावर ताबा मिळविणें ही महा कठीण गोष्ट आहे. त्यांपैकीं सर्वांत मोठा शत्रू म्हणजे क्रोध. एवढ्याशा व लहानसहान गोष्टीमुळेंही आम्हीं भडकतों. हें भडकणें क्रोधावश होणें व शांततेला मुकणें आम्हांला थांबवितां आलें पाहिजे.

कोणत्याही परिस्थितीत रागवायचें नाहीं, मनाचा समतोल बिघडूं द्यावयाचा नाहीं, हा एक मोठ्यांत मोठा गुण आहे, तो प्राप्त करून घेण्याची साधना आपण करावयाची आहे.

सत्त्व, रज व तम या तीन गुणांचें कमी अधिक प्रमाणांत प्रत्येकांत प्राबल्य असते. सात्वीक स्वभावाचा मनुष्य सहसा रागवायचा नाहीं. त्याला रागापेक्षां शांततेची आवड असते. जो रागावत नाही. कोंणत्याही परिस्थितींत शांत राहूं शकतो. असा मनुष्य सर्वांना आवडतो. त्याला कोणी शत्रू असत नाहींत. तो सर्वांचा प्रिय असतो.

या जगांत तोडण्यासाठी नव्हे तर जोडण्यासाठीं आम्हीं आलों आहोंत. क्रोध हा तोडणारा, मोडणारा आहे. संहार करणारा आहे. त्याला आम्हीं आपल्यापासून फार दूर अंतरावर ठेविला पाहिजे. तरच या जगांत माणूस या नात्यानें आम्हीं वावरू शकूं.

रोजच्या व्यवहारांत क्रोधावश होण्याचे प्रसंग हरघडी येत असतात. त्या त्यावेळीं संयम बाळगून आम्ही जर वागूं लागलों तरच आमचें डोकें शांत राहील व रोजचे व्यवहार सुरळीतपणें पार पाडतां येतील. कोणत्याहीं परिस्थितींत डोकें गरम होऊं न देणें हा एक मोठ्यांत मोठा गुण आहे. ती एक सिद्धी आहे. ती सहजासहजीं नाहीं साध्य होत. त्यासाठीं तपस्या करावी लागत असते. त्यासाठीं दीर्घकालीन संवयीनें मनावर ताबा मिळवावा लागत असतो. ज्यांना लहानपणापासून शांत रहाण्याची संवय जडली आहे ते खरोखर धन्य होत. पुढें ती स्वाभाविकपणें वाढत जात असते.

यासाठींच लहानपणापासून मुलें कोणाच्या सहवासांत येतात याची काळजी वाहिली पाहिजे. त्यांच्या मनावर सुसंस्कार घडत जातील याबद्दल दक्षता घेण्यांत आली पाहिजे. 'जो गुण बाळा। तो जन्म काळा!' याची जाणीव ठेवली पाहिजे. लहान मुलांना दुसऱ्यांस अपशब्द बोलण्याची किंवा शिव्यागाळी देण्याची संवय सहज अंगवळणीं पडूं शकते आणि तोच दुर्गुण मोठेपणीं वाढत जातो. त्यामुळें होतें काय? तो माणूस स्वतःच्या तोंडानें स्वतःचे भारी नुकसान करून घेत असतो. किती त्याची कल्पनाही करतां येणार नाहीं.

प्रत्येकानें आपल्या घरांत सदासर्वकाळ शांत वातावरण राहील याबद्दल अतिशय दक्षता बाळगली पाहिजे. ज्या घरांत सदैव तंटे भांडणे चालली आहेत, कोलाहल आरडाओरड चालली आहे तें घर कसलें? तेथें देवाचें वास्तव्य कधीं चुकूनही होणार नाहीं. 'सदा शांति राहे वस्ती। तेथें देवाचो वसतो।' असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं.

आमच्या धार्मिक ग्रंथांतून शांततेसंबंधानें कितीतरी मंत्र आहेत. प्रत्येक धार्मिक कार्यात शांततेनें वागण्यासंबंधीं मंत्र आहेत. भगवंताला 'शांताकारं भुजगशयनं'—म्हटलें आहे. सर्पाच्या शय्येवर पडले असतांही भगवान् कसे शांत राहिले आहेत. ते जगन्नायक झाले ते उगाच नाहीं.

रागासारखा मानवाचा दुसरा शत्रू नाहीं. एकदां का रागाचा पारा वर चढला म्हणजे माणूस हा माणूस राहूं शकत नाहीं. तो वेडापिसा, पागल बनतो व त्या भरांत तो काय बोलेल, आणि काय करील हें सांगतां येणें कठीण असतें. त्यामुळें तो इतरांचें नुकसान करून स्वतःचेंही अपरंपार नुकसान करून घेत असतो. नको! नको!! रागाच्या आहारीं जाणें नको! त्यामुळें मनुष्य मातीमोल होऊन जात असतो. यासाठीं राग सोडून कोणत्याही परिस्थितीत शांत रहाण्याची संवय प्रयत्नें करून आपण लावून घेतली पाहिजे. राग आला असतां एकदम तो शब्दांच्या रूपानें प्रगट न करतां दहा अंक मोजावे म्हणून सांगितलें आहे ते कां? तो क्षण टाळतां आला पाहिजे. तो आपली व इतरांची अपरंपार हानि करणारा क्षण असतो. मनुष्यत्व गमावून पशू बनविणारा तो क्षण असतो. त्या क्षणावर आपणास विजय मिळवितां आला पाहिजे. तो नाहीं आला तर मनुष्य काय करील याचा नेम नसतो.

यासाठीं प्रत्येक मनुष्यानें रागावर जय मिळवून शांततेची कांस धरण्याचें धोरण स्वीकारलें पाहिजे. साईबाबांच्या कृपेनें तेवढें सामर्थ्य आमच्या ठायीं येवो हीच त्यांच्या चरणी आमची सदैव प्रार्थना.

—संपादक

# अखील हिंदूंचा धर्म-ग्रंथ

समाजापुढें ज्या प्रकारचें तत्त्वज्ञान असतें तदनुसार त्याची मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टि बनते व त्याप्रमाणें त्याची या जगांत उन्नति व अवनति होते. गौतम बुद्धानें वैदिकधर्मामधील यज्ञांतर्गत पशुहिंसेवर जोराचा हल्ला चढविला व धर्माची तत्त्वें समाजाच्या खालच्या थरापर्यंत सर्वांना सारखीं उपलब्ध केली, हा त्याच्या कार्याचा निःसंशय चांगला भाग होता. परंतु शाक्यमुनीच्या जगच्छून्यवादी तत्त्वज्ञानामुळें आणि सत्य नि अहिंसा या दोन तत्त्वांच्या अव्यवहार्य अशा अतिरेकी उपदेशामुळें समाजांतील ऐहिक वैभवाबद्दलची आकांक्षाबुद्धि व क्षात्रवृत्ति नष्ट झाली. समाज जिवंत राहण्यासाठीं या दोन वृत्तींची अतिशय आवश्यकता असते. जग हें शून्यांतून निर्माण झालें व शून्यांतच त्याचा लय होणार असें म्हटल्यावर मनुष्याला जगण्याचा नि प्रयत्नपूर्वक कांहीं पुरुषार्थ संपादन करण्याचा उत्साह कोठून निर्माण होणार? कितीहि बडपड केली तरी शेवटी ती आपल्यासकट शून्यांतच विलीन होणार, तेव्हां जो उठला तो निर्वाणाच्या मागें लागला व तत्सिध्यर्थ संन्यास घेऊं लागला. या सरसकट संन्यासग्रहणाच्या अपप्रयोगामुळें भिक्षुवर्गांत अनीतीचा प्रादुर्भाव होऊन समाजाचा अधःपात झाला व स्वसंरक्षणासाठीं तरी हातांत शस्त्र घेऊन आपल्यावर अन्याय्य आक्रमण करणाऱ्या आततायी मनुष्यास शासन करणें आवश्य आहे, इतकाहि विवेक राष्ट्रांत राहिला नाहीं. आणि महंमद बिन कासिम ज्यावेळीं सिंध प्रांतावर स्वारी करून आला त्या वेळीं डोकीं मुंडण केलेल्या, हातांत दंडकमंडलु धारण केलेल्या अहिंसेच्या आत्मघातकी तत्वज्ञानानें पछाडल्या गेलेल्या आणि मुखानें ' धम्मं सरणं गच्छामि। संघं सरणं गच्छामि। बुद्धं सरणं गच्छामि। ' अशा घोषणा करीत भटकत असलेल्या बौद्ध भिक्षूंचे हजाराहजारांचे तांडे त्याला भेटले. पण त्यांनीं त्या मुसलमानांना कांहींहि प्रतिकार केला नाहीं. बौद्धधर्मांतर्गत अहिंसेच्या अतिरेकी तत्वज्ञानामुळें सारा समाज नेभळा झाला, समाजामधील वीरवृत्ति मावळली गेली आणि जगांत साधण्यासारखें कांहीं आहे ही वृत्ति नष्ट होऊन सर्वत्र ऐहिकाविषयी एक विलक्षण उदासीनता पसरली. त्याचा एकंदर परिणाम पुढें कसा झाला हें सर्वांना माहीत आहे. तो इतिहास येथें विस्तारानें कथन करण्याचें कांहींच कारण नाहीं. पण समाजापुढें ज्या प्रकारचें तत्त्वज्ञान असतें तशी त्याची वृत्ति बनते, वृत्तिनुसार कृति घडते नि कृतीनुसार फल मिळतें ही कारणपरंपरा नीट समजून घेतली तर समाजापुढें अनिष्ट तत्वज्ञान वावरत राहिलें तर त्याचा कसा दुष्परिणाम होतो हें सहज ध्यानांत येईल. समाज हा वर्धिष्णु, जयिष्णु नि प्रभाविष्णु व्हावयास हवा असेल तर

समाजापुढें तसेंच तेजस्वी नि विजिगीषु वृत्तीचें तत्त्वज्ञान ठेवावयास हवें. गुरु श्रीनानकांनीं हिंदु नि मुसलमान या दोन समाजांत सलोखा निर्माण व्हावा अशा सोज्वल हेतूने शीख धर्माची संस्थापना केली, पण अलमगीर औरंगजेबास तें रुचलें नाहीं. व त्यानें आपली भक्षक दृष्टि शीख समाजाकडे वळविली. हें पाहतांच गुरु गोविंदसिंहांनीं शीख समाजाच्या हातांत कृपाण दिलें. चारहि बाजूंनीं प्रबल मुसलमानी सत्तेचा वेढा पडला असतांहि शीख समाज त्यांतून तगून राहिला याचें कारण त्यांचे क्षात्रवृत्तिप्रधान तत्त्वज्ञान होय. ' जर कुणी तुझ्या उजव्या गालफडांत मारली तर तुझा डावा गाल त्याच्यापुढें कर, ' या अनाग्रही तत्त्वज्ञानावरच सारी भिस्त ठेवून जर पाश्चिमात्य राष्ट्रांनीं आपल्या राष्ट्रनौकांचें सुकाणू वळविलें असतें, तर आज पंचखंडांत जो त्यांच्या कर्तृत्वाचा डिंडिम दुमदुमत आहे तो दुमदुमला नसता. पंधराव्या शतकांतील सार्वत्रिक विचारक्रांतीनंतर युरोपमधील निरनिराळ्या ख्रिश्चन राष्ट्रांनीं रोमच्या पोपची सत्ता गुंडाळून ठेवली व बायबलांतील निराशावादी तत्त्वज्ञान चर्चच्या चार भिंतीत कोंडून टाकलें, तेव्हांच त्यांच्या सर्वांगीण उन्नतीच्या आधुनिक युगास प्रारंभ झाला.


## धर्माची व्याप्ति

मानवी जीवनाचे ऐहिक नि पारलौकिक असे दोन भाग असले तरी पारलौकिक भाग साधण्यासाठीं ऐहिकाचा सर्वथा त्याग करण्यानें दोहोंनाहि मुकण्याचा प्रसंग येण्याचा संभवच अधिक असतो. आकाशांतल्या चंद्राचा हव्यास धरून वेड्याप्रमाणें धावत सुटलेल्या मनुष्याच्या हातांत ते चंद्रबिंब कधींच सांपडत नाहीं, पण पायाखालच्या परिस्थितिकडे दुर्लक्ष झाल्यामुळें खड्ड्यांत पडून त्याचा कपाळमोक्ष मात्र होतो. 'धर्म' या शब्दाला हल्लीं केवळ 'पारलौकिक कल्याणासाठीं स्वीकारलेला मार्ग एवढाच अर्थ राहिला आहे, पण ' धर्म ' या शब्दाचा मूळचा अर्थ तसा नाहीं. हिंदु संस्कृतीस अनुसरून दुर्लभ मानव जन्म प्राप्त झाल्यावर मनुष्यानें चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ति करून घ्यावयाची असते. ते चार पुरुषार्थ धर्म. अर्थ. काम नि मोक्ष हे होत. यांतील धर्म या पहिल्याच पुरुषार्थाचा अर्थ ' पारलौकिक कल्याण ' असा असता, तर शेवटचा मोक्ष हा वेगळा पुरुषार्थ सांगावयाचे कांहींच कारण नव्हते. परंतु पूर्वकालीं ' धर्म ' या शब्दाचा अर्थ ' या जगांत वागावयाचे सदाचाराचे नियम ' असा होता; व तत्संबंधींच्या प्रवचनास ' धर्मप्रवचन ' अशी संज्ञा असून महाभारतांत ज्या ज्या ठिकाणीं पारलौकिक कल्याणाचा विचार केलेला विचार आहे, त्या त्या ठिकाणी पर्वास ' मोक्षधर्मपर्व ' वा तदर्थक दुसरी स्वतंत्र नांवें उपयोजिण्यांत आलेली आहेत. जेव्हां भगवान व्यास ' ज्या धर्माच्या योगानें अर्थ व काम या दोहोंची प्राप्ति होते तो धर्म तुम्ही कां आच-

रीत नाहीं. ! " असा प्रश्न विचारतात, तेव्हां त्या धर्माचा अर्थ 'इहलोकीं वागण्याचे सदाचाराचे वा नीतीचे नियम' असाच घेतला पाहिजे. कारण तसा अर्थ नसता तर धर्मापासून प्राप्त होणाऱ्या गोष्टींत अर्थ व काम या केवळ लौकिक फलांचा समावेश न करतां 'ज्या धर्मानें पारलौकिक कल्याण साधतें वा मोक्षप्राप्ति होते तो धर्म' असा शब्दप्रयोग श्रीव्यासांनी केला असता. व्यवहारांतील आपण ज्या वेळीं राजधर्म, देशधर्म, ज्ञातिधर्म, कुलधर्म, बंधुधर्म, पुत्रधर्म या शब्दांचा प्रयोग करतो, त्या वेळीं त्यांतील 'धर्म' या शब्दांचा पारलौकिक प्राप्तव्याशीं कांहींही संबंध नसून ऐहिक संबंधाला अनुसरूनच तो शब्द वापरलेला असतो. सारांश धर्म या जगांतील व्यवहार सुरळीत चालण्यासाठीं पाळावयाचे नीतीचे नियम' असा आहे, आणि पारलौकिक कल्याण साधावयाचें असेल तरी ऐहिक व्यवहाराकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. मोक्ष मिळविण्यासाठीं प्रयत्न करावयाचा असला तरी या देहाच्या द्वारेंच सर्व प्रयत्न करावा लागतो तेव्हां आत्मकल्याणावरील आपली दृष्टि चळूं न देतां कां होईना पण ऐहिक व्यवहार संभाळलेच पाहिजेत. ध्येयसिद्धी क्रमाक्रमानेंच घडते, एकदम चढूं शकत नाहीं. गच्चीवर जाण्यासाठीं निघालेला मनुष्यास ज्याप्रमाणें 'मधल्या दहा पायऱ्यांवर मी पाय ठेवणारच नाहीं' असें म्हणून उडीसरशी गच्चीवर जातां येत नाहीं, त्याचप्रमाणें या जगांतील व्यवहार सर्वथा टाळून एका झेंपेसारखी कुणीहि मोक्ष मिळवूं शकत नाहीं. एखादा असामान्य मनुष्य त्या धारणेचा असेलहि कदाचित् पण असा मनुष्य कोट्यावधि लोकांत एखादाच नि अपवादात्मक असतो; आणि शास्त्रांची रचना ही अशा असामान्य मनुष्याच्या धारणेस अनुलक्षून करावयाची नसून सामान्य मनुष्याचें कर्तृत्व नि शक्ति यांच्या मर्यादा ध्यानांत घेऊन तदनुसार करावयाची असते. अशा सामान्य लोकांसाठीं या जगांतील सारे व्यवहार सुखानें पार पाडून त्यांतूनच अंतीं मोक्षाची प्राप्ति कशी करून घ्यावी हें सांगणाऱ्या ग्रंथाची आवश्यकता आहे. तसा श्रीमद्भगवद्गीता हाच ग्रंथ आहे. 'प्रस्थानत्रयी' हा प्राचीन हिंदुधर्माचा पाया होय. त्यातील उपनिषदें व वेदांतसूत्रें हीं निवृत्तिमार्गाची प्रतिपादक नि विशेष मान्यता पावलेली ! पण संसाराचा सर्वथा त्याग करून वनात जाऊन राहणाऱ्या व केवळ मोक्ष साधूं पाहणाऱ्या साधकासाठीं व मुमुक्षूंसाठीं प्रधानतः उपनिषदांतील तत्त्वज्ञान लिहिलेलें आहे, आणि तें तत्त्वज्ञान लिहिणारे मुनीही तसेच आत्मसाक्षात्कार झालेले ब्रह्मवेत्ते ऋषी होते. त्यांचा उपदेश सामान्य संसारी जनांना एकदम कसा आकलन होणार ! याच्या उलट श्रीगीता ज्या नारायणानें सांगितली तो भगवान श्रीकृष्ण नि ज्या नराला सांगितली तो धनुर्धर पार्थ, हे दोघेहि प्रत्यक्ष संसारी नि जगाच्या व्यवहारांत पूर्ण लक्ष घालणारे असे होते. त्यामुळें इहलोकीं सर्व ऐश्वर्य प्राप्त करून घेऊन उन्नतिशिखरावर चढूं इच्छिणाऱ्या व तें सर्व करून आत्मप्राप्ति

करून घेऊं इच्छिणाऱ्या समाजासाठीं, संसारांतील दैनंदिन व्यवहार अंतिम मोक्षाच्या आड येऊं न देतां कसे करावेत हें सांगणारा श्रीमद्भगवद्गीता हाच ग्रंथ धर्मग्रंथ म्हणून योग्य आहे, व तसें म्हटलें जातें तें सर्वथा बरोबर आहे.

जगामध्यें व्यक्ति तितक्या प्रकृति असल्यानें जितक्या व्यक्ति तितके धर्माचरणाचे मार्ग असावेत हें युक्तच आहे. हिंदभूमींत धार्मिक स्वातंत्र्य विशेषेंकरून असल्यानें मानवी जीवनाचा नि सृष्टीचा निरनिराळ्या दृष्टीनें विचार करणारे अनेक पंथ नि ग्रंथ येथें निर्माण झाले आहेत. वेद, आरण्यकें, उपनिषदें, गीता, वेदांतसूत्रें, स्मृती, पुराणें, भाष्यें, टीका, असे कितीतरी धार्मिक तत्वज्ञावरील ग्रंथ येथें लिहिले गेले. संस्कृत भाषेंत या विषयावर अमूप वाङ्मय आहे. पण सार्वत्रिक क्रांतीच्या सीमारेषेवर उभा असलेला हा हिंदुस्थान नव्या कालाला अनुरुप अशा अनेक नव्या विचारांचे नि कल्पनांचे ग्रहण करीत आहे. एकराष्ट्रीयत्वाची कल्पना वाढत आहे. त्याला अनुसरून भरतभूमींतील प्रत्येक हिंदूला पंजाब, बंगाल महाराष्ट्र, आंध्र असा त्याचा म्हणून एक विशिष्ट प्रांत असला तरी हिंदुस्थान हा सर्वांचा मिळून एक देश आहे. प्रत्येक हिंदूला सिंधी, कानडी, गुजराथी, गुरुमुखी अशी त्याची म्हणून एक विशिष्ट भाषा असली तरी संस्कृतनिष्ठ हिंदी ही सर्वांची मिळून एक राष्ट्रभाषा आहे. प्रत्येक हिंदूला वैदिक शीख, जैन, लिंगायत, आर्यसमाजी, ब्राह्मो असा त्याचा म्हणून एक विशिष्ट पंथ असला तरी सर्वांचा मिळून एक हिंदूधर्म आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक हिंदूला त्याच्या पंथाचा असा विशिष्ट ग्रंथ असला तरी श्रीमद्भगवद्गीता हा अखिल हिंदूंचा मिळून एक धर्मग्रंथ आहे.



# आसक्ति बाळगणें हानीकारक

या जगातं जन्माला आलेला कोणताहि प्राणी कर्म केल्यावाचून एक क्षणभरहि जिवंत राहूं शकत नाहीं.

कोणताहि देहधारी मनुष्य कर्मांचा सर्वथा त्याग करूं शकत नाहीं. प्रकृतीच्या गुणानींच मनुष्य कर्माला प्रवृत्त होत असतो. प्रकृतीच्या या नियमाच्या उलट जाऊन 'मी कर्मच करणार नाहीं' असा आग्रह कोणी धरील, तर त्याची शरीर यात्राहि चालणार नाहीं. शिवाय केवळ बाह्य कर्में सोडून दिल्यानें पुरुषास नैष्कर्म प्राप्त होत नाहीं, कारण व्यवहारामध्यें वागताना केवळ इंद्रियांचा निग्रह करून मनाने जो विषयांचें चिंतन करीत राहील तो मिथ्याचारी होय. बरें, प्रयत्नपूर्वक एखाद्यानें नैष्कर्म्य प्राप्त करून घेतलें तर तेवढ्याने तो मुक्त होत नाहीं. ब्रम्ह्यानें सृष्टीच्या आरंभीं प्रजा व यज्ञ हीं बरोबर निर्माण केलीं व त्या यज्ञाच्या सहाय्यानें प्रजेस सिद्धि मिळविण्यास सांगितलें. असा तो सर्व सिद्धि प्राप्त करून घेण्याचें साधन असलेला यज्ञ कर्मांमधून उद्भूत झाला असून तें कर्म मूळ ब्रम्हातून निर्माण झालें आहे. [ कर्म ब्रम्होद्भवं विद्धि। गीता ३. १५. ] तस्मात् कर्म हें अनादि आहे. प्रकृतीच्या नियमाना बद्ध असलेल्या या जगात कर्म केलेंच पाहिजे, तें कुणालाहिं टाळता येणार नाहीं. तें टाळण्याचा वृथा खटाटोप न करता त्या कर्मांचे बंधनत्व तेवढें नष्ट करण्याचा प्रयत्न करणें अधिक युक्त आहे.

### आसक्तीमुळें दुःख

आणि प्रकृतीच्या या पसाऱ्यात कोणतीहि वस्तु वा कर्म हे स्वभावतः पुरुषास बंधनकारक नाहीं वा मोक्षदायक नाहीं. प्रकृति ही सदैव तिच्या नियमानुसार वर्तत आहे. तिच्या या व्यापारामध्यें नित्यशः वावरत असताना आपल्या मोक्षाच्या अंतिम साध्याच्या आड न येईल अशा रीतीनें कर्म करणें हें खरें कौशल्य आहे व त्यालाच ( कर्म ) योग म्हणतात. ( योगः कर्मसु कौशलम । गीता २. ५०. ) प्रकृति पुरुषांच्या सुखासाठीं वर्तत नाहीं वा दुःखासाठींही वर्तत नाही. आकाशांतील ढगांकडे पहात असताना आपण मनात कल्पावा तो आकार त्या ढगाला प्राप्त होतो. त्या प्रमाणें सृष्टींतील भिन्न भिन्न पदार्थांविषयीं आपल्या मनात जी जी भावना निर्माण होईल तदनुसार त्या त्या पदार्थांत तो तो गुण निर्माण होत असतो. कोणत्याहि गोष्टीकडे मनुष्य जोंवर अलिप्त बुद्धीनें पहात असतो, तोंवर त्या गोष्टीचा कोणताच सुखदुःखात्मक

परिणाम त्या माणसाच्या मनावर होत नसतो. बाजारातून घरीं परत येत असताना कोणीतरी मोटारखाली सांपडलें आहे असें कळताच इतर चारचौघाप्रमाणेच आपणहि केवळ कुतूहलबुद्धीनें तिकडे वळतों, तेव्हां आपलें मन शांत असतें, परंतु गर्दीतून डोकावून पाहिल्यावर अपघातात सांपडलेला मनुष्य आपला बंधु वा आप्त आहे असें आढळून येताच आपल्या मनाचा धीर सुटतो व आपण शोकग्रस्त होतो. एखाद्या सहकारी कंपनींत आपण हिशेबनीस असलो व त्या मंडळीचा व्यापारात तोटा होत आहे असें आपल्याला हिशेब लिहिताना आढळून आलें, तरी अगदी स्थिर चित्तानें आपण तें सारे आंतबट्याचे हिशेब लिहीत असतो. पण मंडळीस आलेल्या त्या तोट्यामुळें नोकरांच्या पगारास कात्री लागून आपला पगार कमी झाला की मात्र आपलें मन लगेच कष्टी होतें. यावरून हें सहज लक्षात येईल की, प्रकृतीच्या राज्यात घडणारा कोणताहि व्यवहार आपल्या दुःखास कारणीभूत होत नसतो, तर त्यातील कांही विशिष्ट व्यवहाराबद्दल आपल्या मनांत निर्माण होणारी लिप्तताच आपल्या दुःखास कारणीभूत होत असते. सकाळच्या प्रहरीं नुकतेच आलेले त्या दिवसाचे टपाल चाळीत असताना स्टॅलिनग्रॅडच्या लढ्यात दोन लक्ष जर्मन सैनिक ठार झाले वा सिसिलीवरील स्वारींत मित्रराष्ट्रांनीं ८० हजार युद्धबंदी पकडले, या महायुद्धातील भीषण वृत्तांचा आपल्या मनावर तसा कोणताच परिणाम होत नाहीं व आपण निर्विकार चित्तानें ते वृत्तपत्र बाजूला ठेवून दुसरें पत्र फोडतो. परंतु त्या दुसऱ्या पत्रांतून 'आपल्याला ताबडतोब द्वीपांतरी जाण्याची सरकारी आज्ञा मिळाल्याचें' आपल्या मुलानें लिहिलेले वाचताच आपले चित्त कावरें बावरें होऊन जातें व दिवसातील त्यानंतरच्या अन्य कार्यक्रमांकडे आपलें मन नीट लागेनासें होतें. याचें कारण इतकेंच कीं, महायुद्धाच्या वृत्तपत्रीय बातमीत आपल्या मनाचा कोणताच धागा गुंतलेला नव्हता, पण तोच मुलाच्या पत्रामधील मजकुरात गुंतलेला होता. यावरून हें ध्यानात येईल कीं, कोणत्याहि पदार्थांत वा घटनेंत प्रकृतितः बंधकत्व नाही, तर त्या वस्तूच्या वा घटनेच्या ठायी असणाऱ्या आपल्या मनाच्या लिप्ततें बंधकत्व आहे. कोणतेंहि कर्म बंधक नाहीं, तर त्या कर्माच्या परिणामाच्या वा फलाच्या ठायीं असणारी आपल्या मनाची आसक्ति बंधनकारक आहे.

### कर्तव्याचरण महत्त्वाचें

यासाठीं कोणतेहि कर्म करताना त्या कर्माच्या बऱ्यावाईट परिणामाच्या ठायीं आपलें मन आसक्त न होऊं देतां, केवळ आपलें नियत कर्तव्य म्हणून तें कर्म करण्याची सवय आपल्या मनाला लागली पाहिजे. ज्या वेळीं तें करणें आपलें प्राप्त कर्तव्य असेल त्या वेळीं तें करणें इतकेंच आपलें काम आहे. त्या कर्मांतून कोणतेंहि बरे वा वाईट फल निर्माण झालें, तरी त्याकडे आपल्या समबुद्धीनेंच पाहतां आलें पाहिजे. स्टॅलिनग्रॅडच्या वेढ्यात दोन लक्ष जर्मनांचा बळी पडतो. या घटनेकडे जितक्या शांतचित्तानें आपण 'युद्धाचीं एक अपरिहार्य घटना' म्हणून पाहतो.

तितक्या समदृष्टीनें 'सरकारी नोकरीतील एक स्वाभाविक घटना' या भावनेनें आपल्याला आपल्या मुलाच्या द्वीपांतरीं झालेल्या बदलीकडे पाहतां आलें पाहिजे. रुग्णालयात आपण एखाद्या तिऱ्हाईत रुग्णाची शुश्रुषा कर्तव्य बुद्धीनें करतों व त्या रुग्णाचें शेवटीं कांहीं बरे वाईट झाले तरी आपण त्याचें कांहीं वाटून घेत नाहीं. त्याचप्रमाणें स्वतःची पत्नी आजारी पडली व तिची मनोभावानें शुश्रुषा करूनहि ती शुश्रुषा फळाला आली नाहीं तरी त्या घटनेकडे आपल्याला स्थितप्रज्ञतेनें पाहतां आलें पाहिजे; आणि 'आपण आपलें कर्तव्य केलें, आपला भाग संपला,' इतकें म्हणून आपण त्या घटनेचा फाजिल शोक करतां कामा नये. कारण आपलें मन स्थिर नि शांत राहणें हे साऱ्या सुखाचे उगमस्थान आहे. सभोंवतालीं केवढाहि मोठा कोलाहल होवो, कितीहि भीषण संकटांचा वर्षाव होवो, अपयशाचे कितीहि निर्घृण आघात होवोत, त्या साऱ्या माराखालीं आपलें मन सदैव स्थिर नि शांत राहिलें पाहिजे. समुद्राच्या पृष्ठ भागावर केवढेंहि प्रचंड वादळ झालें व कितीहि पर्वतप्राय लाटा उसळत असल्या तरी समुद्राच्या पोटात नेहमीचीच शांतता वास करीत असते, बाहेरच्या वादळाचा तेथें मागमूसही नसतो. सुखदुःखाचे केवढेहि मोठे प्रसंग उद्‌भवले तरी आपल्या मनाची स्वाभाविक समता भंग पावतां कामा नये, सभोवती चालू असलेल्या सर्व गोष्टी हे प्रकृतीचे चाललेले खेळ आहेत, त्यात लिप्त होण्याचे आपल्याला कांहींच कारण नाहीं, कारण आपले सत्य स्वरूप याहून वेगळें आहे ज्या काळीं आपलें जें योग्य कर्तव्य असेल तें मनोभावाने करणें एवढेच आपले काम होय. कोणत्याहि घटनेशीं तादात्म्य पावून त्यांतून निर्माण होणाऱ्या सुखाचे वा दुःखाचे अधिकारी होण्याचे आपल्याला कांहींच कारण नाहीं. कांटा 'बोंचतों' वा 'अग्नीने भाजतो' या कांट्याच्या किंवा अग्नीच्या गुणाबद्दल आपण कधींहि वाईट वाटून घेत नाहीं. कारण काट्यावर पाय पडतांच तो बोचावा वा अग्नीला स्पर्श होताच त्यानें हात भाजावा, हे त्या त्या वस्तूंचे व इंद्रियांचें प्रकृतिधर्म आहेत हे आपणास पक्कें माहीत असतें. त्याचप्रमाणें सभोंवताली घडणाऱ्या सर्व घटना या प्रकृतीच्या नियमानुसार घडत आहेत, त्यात लिप्त होऊन त्याचे सुख वा दुःख मानण्याचें आपल्याला कांहींच कारण नाहीं. लिप्ततेंत व फलाशेंत बंधन आहे आणि अलिप्ततेंत व निष्कामतेत बंधन नाहीं. हे आपण नीट समजून घेतलें पाहिजे.

### कर्मयोगाची चतुःसूत्री

आत्मनिष्ठता व आत्मसंतुष्टता ही साऱ्या शांतीचे नि समाधानाचे निधान आहे. इंद्रियाचे विविध विषय व त्यांचे त्या विषयाबद्दलचे राग वा द्वेष हे ठरलेले आहेत; त्यांच्या आहारी आपण जातां कामा नये. विषयामागें इंद्रियें, इंद्रियांमागें मन व मनामागें बुद्धि धावूं लागेल तर सुखदुःखाच्या फेऱ्यामध्यें सांपडून आपला आत्मा मलीन होतो. याच्या उलट इंद्रियें हीं विषयांच्या आहारीं न राहता मनाच्या ताब्यात

असतील, मन इंद्रियांमागे न धावतां बुद्धीच्या स्वाधीन असेल तर अशा आत्मनिष्ठ मनुष्याचें सर्व सुख त्याच्या आत्मस्वरूपातच सांठवलेले असतें. ज्याला स्वतःच्या आत्म्याच्या ठिकाणींच असें आनंदस्थान लाभलें, त्याला स्वतःसाठीं साधण्यासारखें या जगांत कांहींच राहत नाहीं. तरीपण त्याला स्वतःला साधण्यासारखें कांहींच राहिलें नाहीं म्हणून त्यानें कर्मांचा सर्वथा त्याग करता कामा नये. तर, केवळ सामान्य लोकाना उदाहरण घालून देण्यासाठीं त्यांनें विहित कर्म केलेच पाहिजे. जनकादिकानींहि हेंच केलें होतें. स्वतः भगवंतास या जगात कांहींच साधावयाचें नाहीं. तरी पण सामान्य जन, श्रेष्ठाच्या वर्तनाचे अनुकरण करतात व आपण कर्म न केलें तर या लोकांचा उच्छेद होईल हे ध्यानात घेऊन, केवळ धर्मसंस्थापनार्थ व लोकसंग्रहार्थ भगवान कर्म करीत असतात. परंतु अशा रीतीनें कर्म करीत असतांहि त्यांना कोणत्याच कर्मांचा लेप लागत नाहीं, कारण कोणत्याच कर्मांच्या फलाच्या ठायीं त्यांची स्पृहा नसते. तेव्हा आपला सुद्धा अधिकार केवळ कर्म करण्यापुरताच आहे हे ध्यानात ठेवून कोणत्याही कर्मांच्या फलाची आशा आपण धरतां कामा नये, कारण तो आपला अधिकार नव्हे; बरें, कर्मांच्या फलाची अभिलाषा धरावयाची नाहीं म्हणून कर्मच करावयाचे नाही असेंहि आपण करता कामा नये. ( कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङोस्त्वकर्माणि ॥ गीता २.४७. ) गीतारहस्यकारानीं म्हटल्या-प्रमाणें ही खरोखरीच ही गीताप्रणीत कर्मयोगशास्त्राची चतुःसूत्री आहे. ज्ञानी पुरुषानें ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं याबद्दल फार प्राचीनकाळापासून दोन निष्ठा चालत आल्या होत्या. एक संन्यास व दुसरी कर्मयोग. दोनहि मार्गांनीं अंती निःश्रेयसाची प्राप्ति होते. परंतु गीतेच्या मतें त्यातहि संन्यासापेक्षा कर्मयोगाची महती विशेष आहे. कर्मांचे बंधकत्व टाळून कर्म करण्याचें जें शास्त्र तें कर्मयोगशास्त्र होय.

कोणतें कर्म करावें हें जाणणें फार कठीण आहे. येथें ज्ञानी पुरुष सुद्धा गोंधळलेले आहेत. पण हे जाणणें कठीण असलें तरी कर्म कोणते, विकर्म कोणतें व अकर्म कोणतें हे सर्व प्रयत्नपूर्वक समजून घेतलें पाहिजे. कारण कर्मांची गति गहन आहे. अकर्मा ( म्हणजे कर्म न करण्याच्या आग्रहातील ) कर्मत्व ( म्हणजे बंधकत्व ) आणि ( फलाशारहित बुद्धीनें केलेल्या ) कर्मातील अकर्मत्व ) जो जाणतो तोच खरा बुद्धिमान होय. कर्मांचे बंधन नको म्हणून ज्ञानयोगी सर्वच कर्मांचा त्याग करतो तर कर्मयोगी केवळ त्या कर्मांच्या फलाचा त्याग करतो व कर्मबंधनांतून मुक्त होतो तेव्हां या जगात राहून कर्म टाळता येणार नाहीं हे पक्कें ध्यानात ठेवून कर्मांचा सर्वथा संन्यास करण्याच्या खटाटोपात न पडतां, जें कर्म करणें प्राप्त होईल तें सतत कर्मफलाच्या ठायी आसक्ति न ठेवता करावें. कारण अशा रीतीनें अनासक्त बुद्धीनें कर्म करणारा पुरुष परमगतीला जातो. अशा प्रकारचा भगवान श्रीकृष्णानीं गीतेंत अर्जुनाला सांगितलेला प्रवृत्तिपर कर्मयोगाचा हा उपदेश आहे.

---

# परोपकाराची भावना

आपलें रोजचें जीवन तपासून पहाण्याचा आपण कधीं प्रयत्न केला आहे का ? रोजच्या कार्यक्रमांत दुसऱ्यांसाठीं मला कांहीं तरी करायचें आहे या विचाराला कधीं स्थान मिळतें का ? मी आणि माझें कुटुंब या पलिकडे आपली दृष्टि कधीं तरी जाते का ? इतरेजनांसाठीं मी कांहीं ना कांहीं केलें पाहिजे हा विचार तुमच्या मनांत येत नसेलच असें नाहीं. परंतु त्यासंबंधीं मनांत उत्साह तळमळ नसल्यामुळें किंवा बहुतेकवेळ पोटापाण्याच्या व्यवसायांत जात असल्यामुळें, आर्थिक असमर्थ्यतेमुळें किंवा अहंकारामुळें वा बेफिकिर स्वभावामुळें मनांत विचार येऊनही आपण कांहीं करूं शकत नसाल. आपण इतरांसाठीं झटावे हा विचार मनांत येत नसेलच असें म्हणवत नाहीं.

आपलें सध्याचें दैनंदिन जीवन अशाप्रकारचें आहे कीं समाजसेवेची संधी पदोपदीं पुढें येत असते. मनांत आणलें वर तिचा फायदा घेण्याची शक्यता असते. त्यासाठीं फारसा वेळ खर्च करण्याची जरूरी नसते; परंतु समाजसेवेसंबंधीं आपणास अगत्य वाटलें पाहिजे तें अगत्य वाटण्यावर सारें अवलंबून आहे.

## त्यामुळें आपलेंही भलें होतें

दुसऱ्यांसाठीं झटणें किंवा समाजसेवेचें एखादे कार्य पार पाडल्यानें आपण दुसऱ्यांचें भलें करूं शकतां एवढेंच नव्हे तर त्यांत आपल्या भलेपणाचाही समावेश आपोआप होत असतो.

हेंच पहा ना. एखाद्या माणसाच्या आपण उपयोगी पडलां; त्याची अल्पशी सेवा आपल्या हातून घडली तर त्यामुळें आपल्या मनाला केवढें समाधान वाटत असतें बरें ! त्यामुळें आपलें मन उंचावतें. तें आनंदाचा अनुभव घेऊं लागते. हा जो अनिर्वचनीय आनंद, त्यामुळें आपल्या वाट्यास येत असतो तो आनंद आपणास कुठेंही मिळूं शकणार नाहीं. तें समाधान आणि तो आनंद तुम्हांला बाजारांत कोण-त्याही दुकानांत विकत मिळूं शकणार नाहीं. त्यामुळें तुम्ही दुसऱ्यांच्या सद्भावना मिळवूं शकतां. त्यामुळें तुम्ही समाजाचा व राष्ट्राचा दर्जा उंचावूं शकतां.

खऱ्या अंतःकरणापासून तुम्ही जी समाजसेवा करतां ती कितीही अल्प असो. तिचे महत्त्व भारी आहे. निःस्वार्थ सेवा ही बहुमोल आहे. तिचें मोलच करतां येणार नाहीं. तिच्या पायीं मिळणाऱ्या समाधानाची तुलना कोणत्याही गोष्टीशीं होऊं शकत

नाहीं. त्यामुळें आपोआप तुमचाही विकास होत असतो. तुमचें नैतिक व अध्यात्मिक उत्थापन त्यामुळें होत असते. तुमचा आध्यात्मिक विकास करून घेण्याचे ते एक हुकमी साधन आहे. ती एक साधना आहे म्हणा ना.

## लहानसहानबाबतींत परोपकार

परोपकार करायचा तर तो केवळ मोठ्या प्रमाणांतच करावा असें नाहीं. लोकांच्या उपयोगी पडायचें तर लहानसहान बाबतींतही उपयोगी पडतां येतें. रस्त्यानें जात असतां कोणी पत्ता विचारला, कोणाजवळ तिकीट काढण्यासाठीं पुरेसे पैसे नसले, कोणी थकला भागलेला असला किंवा कोणाला कसली तरी अडचण भासली तर त्या त्यावेळी निःसंकोचेपणें पुढें सरसावून आपण निःस्वार्थपणें सेवा करूं शकता व त्यापासून मिळणाऱ्या समाधानाचे वाटेकरी निश्चित होऊं शकतां.

पुष्कळ माणसें अशीं आढळून येतात कीं कोणी कांहीं विचारलें असतां त्याच्याशीं बेफिकीरपणें वागायचें धडपणी उत्तर द्यायचें नाहीं !

माणसात नम्रताभाव वास करीत असला पाहिजे. 'नम्र झाला भूतां तेणें कोंडिले अनंता'

## पं. ईश्वरचंद्र विद्यासागर

ईश्वरचंद्र विद्यासागर या नावाचे एक थोर मनाचे सुधारक पंडित होऊन गेले. त्यांचें नाव अखिल भारतांत अजरामर होऊन राहिलें आहे. ते एकदां एका गावाहून दुसऱ्या गावी पायीं प्रवास करीत होते. वाटेंत रस्त्याच्या बाजूला घाणेरड्या अवस्थेंत मरणोन्मुख स्थितींत पडलेला कोणी एक दुर्भागी त्यांच्या दृष्टीस पडला. त्याच्याजवळ दुर्गंधामुळें कोणीही जाऊं शकला नसता परंतु ईश्वरचंद्राचें मायाळू मन त्याला पहातांच पुढें पाऊल टाकण्यास तयार होईना. तें तेथेच थबकलें ईश्वरचंद्राबरोबर आणखी एक प्रवासी होते. त्याचें मन वळवून ते त्या मरणोन्मुख स्थितींत बेहोष पडलेल्या माणसाकडे गेले व सहप्रवाशाच्या सहाय्यानें त्याला त्यांनीं पाटकुळीवर मारून सुमारें दीड दोन मैल चालले. ज्या गावीं जायचें होतें त्या गावीं गेले व तेथें त्या गृहस्थाला औषधोपचार करून व त्याला स्वच्छ धुवून पुसून त्याची जरूर ती सेवासुश्रुषा व्हावी याची त्यांनीं काळजीपूर्वक व्यवस्था केली आणि शेवटीं तो गृहस्थ हिंडताफिरता होऊन आपल्या गावीं निघून गेला ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याबद्दल त्याला केवढी कृतज्ञता वाटली असेल बरे !

त्याचबरोबर विद्यासागरांना केवढें समाधान व कर्तव्यपूर्तीचा आनंद वाटला असेल !

खरी देवसेवा ती हीच होय. ती त्याच्या चरणी रुजू होऊन रहात असते.

**आपलें रोजचें जीवन**

दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचे प्रसंग आपल्या रोजच्या आयुष्यांत क्षणोक्षणी निर्माण होत असतात. आपण त्याकडे लक्ष मात्र पुरविलें पाहिजे. केवळ पैसा म्हणजेच सर्वस्व असें तुम्हीं मानूं नका. पैसा जवळ असो नसो. तुम्ही अन्य प्रकारें अनेकांच्या उपयोगी पडूं शकतां. या जगांत अशी तरी किती माणसें आहेत. कीं जी दुःखांत व हालअपेष्टांत जीवन कंठीत आहेत. त्यांना दोन सहानुभूतीचे शब्द ऐकायला मिळाले, तरी त्यांना बरें वाटेल; परंतु कोणत्यांच्या वाट्याला जात आहे ! तुम्हीं दुसऱ्यांना प्रेम व सद्भावना द्या तुम्हांलाही प्रेम व सद्भावना यांचा लाभ होईल.

जें जवळ असेल त्याचा निःस्वार्थपणें दुसऱ्यांसाठीं उपयोग करावयाचा हें धोरण ठेऊन त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा. देव तुमचें कोट कल्याण करील.



॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# गीतार्थ-सार

*******************************

**गीता हा सर्वोत्तम धर्मग्रंथ होय. गीतेच्या चार ते आठ अध्यायांचा केवळ सारांश पुढें देण्यांत येत आहे. त्यावरूनही गीतेंतील तत्त्वज्ञान कसें सर्वव्यापी आहे याची सहज कल्पना करतां येईल.**

**अध्याय ४ था**—चवथ्या अध्यायाच्या आरंभीं कृष्णानें अर्जुनास सांगितलें कीं, "जो योग मी तुला सांगितला, तो पूर्वी मी सूर्यास सांगितला होता. त्यानें मनूस सांगितला. मनूनें इक्ष्वाकु राजास, आणि त्याचपासून इतर राजांस त्या योगाचें ज्ञान झालें. परंतु तें कालेंकरून नष्ट झालें. तेंच उत्तम योगरहस्य तूं माझा भक्त आणि मित्र म्हणून मी तुला पुनः सांगितलें.

हें ऐकून अर्जुन म्हणाला, "कृष्णा सूर्य एकाकाळीं जन्मला आणि तूं अन्य वेळीं जन्मलास; तेव्हां हा योग त्यास पूर्वी सांगितलास हें मी कशावरून समजावें?" त्यावर कृष्णानें उत्तर केलें–"माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होउन गेले. ते तुला ठाऊक नाहींत, पण ते मी जाणतों. मी जरी जन्ममरणहीन आहे, जरी मी सर्व जगाचा शास्ता आहे, तरी जेव्हां धर्म लोपून अधर्मांचा प्रादुर्भाव होतो तेव्हां धर्मस्थापना करण्याकरितां, व साधूंचें रक्षण व दुष्टांचा संहार करण्यासाठीं मी आपल्या मायेच्या योगानें प्रत्येक युगांत उत्पन्न होतो. याप्रमाणें माझें अवतारकारण जाणून. कामक्रोधांचा त्याग करून, सर्व प्रकारें मजवर भरंवसा ठेवून, बहुत जन ज्ञान आणि तप करून मत्पदाप्रत येतात. जे जशी माझी भक्ति करितात तसा मी त्यांस पावतों. ज्यांस कर्मफलाची इच्छा आहे ते नाना देवतांची आराधना करितात, परंतु गुणकर्मविभागेंकरून चतुर्वर्णात्मक सृष्टि करणारा मी ईश्वर, असें जाणून मला जे भजतात, त्यास कर्म बाधत नाहीं; असें जाणून पूर्वीच्या मुमुक्षुजनांनीं कर्म केलें म्हणून तूंही तेंच कर.

"परंतु कर्म, निष्कर्म, आणि कुकर्म यांतील भेद समजणें फार कठीण आहे. म्हणून तुला सांगतो कीं, कर्मफलाची इच्छा धरून जें करणें तेंच कर्म. निषिद्ध कर्म म्हणजे कुकर्म आणि फळाची इच्छा सोडून, सर्व वासनापरित्याग करून, निराश, निर्मत्सर, निरिच्छ होऊन, सहज प्राप्त होईल त्यांत संतोष मानून, लाभहानि समान मानून, ज्ञानावर दृष्टि देऊन यज्ञादि अवश्य कर्तव्यकर्म आचरण करणें, याचेंच नांव निष्कर्म. यज्ञ अनेक प्रकारचे आहेत ते तुला सांगतों. नाना देवतांची आराधना हा देवयज्ञ; परब्रम्हास सर्व अर्पण करणे, हा ब्रम्हयज्ञ, इंद्रियांचा निग्रह करणे हा संयमयज्ञ;

अनासक्त होऊन इंद्रियांनीं विषय सेवन करणें हा इंद्रिययज्ञ; सर्व इंद्रियांचीं कर्में आणि प्राणांचीं कर्में याविषयींची आसक्तता ज्ञानानें दूर करणें, हा आत्मसंयमनयज्ञ; यथान्यायें द्रव्य संपादून तद्द्वारा यज्ञ करणें, तो द्रव्ययज्ञ; तपश्चरण करणें, हा तपोयज्ञ; योगाभ्यास करणें, हा योगयज्ञ; शास्त्राध्ययन करून ज्ञान संपादणें, हा एक यज्ञ; प्राणवृत्तींचा निग्रह करणें, हा प्राणायामयज्ञ; नियमित आहार करून प्राण धारण करणें हा प्राणयज्ञ असे अनेक प्रकारचे यज्ञ शास्त्रांत सांगितले आहेत. ते आचरण केल्यावांचून, इहलोकींही सुख होत नाहीं, मग परलोकीं कोठून होणार? हे सर्वही यज्ञ कर्मसाध्य आहेत. परंतु त्यांचें तारतम्य असें आहे कीं, द्रव्यद्वारा घडणाऱ्या यज्ञापेक्षां ज्ञानद्वारा घडणारा यज्ञ श्रेष्ठ. कारण ज्ञानामध्यें सर्व कर्मांचें पर्यवसान होतें. तें ज्ञान तत्त्वज्ञान्यांस शरण जाऊन, त्यांची सेवा करून, त्यांस विचार, म्हणजे ते तुला सांगतील. तें ज्ञान तुला प्राप्त झालें असतां पुनः असा मोह होणार नाहीं. त्या ज्ञानाच्या योगानें आत्म्याच्या व माझ्या आश्रयानें सर्व प्राणी आहेत असें तुला समजेल. सर्व प्राण्यांत तूं महापापी असलास तरी ज्ञाननौकेनें सर्व पापांपासून तूं तरशील. जसा प्रदीप्त झालेला अग्नि काष्ठांचें भस्म करून टाकितो, तद्वत् हा ज्ञानरूप अग्नि सर्व कर्मांची बाधा दूर करितो. ज्ञानासारखा दुसरा पवित्र तारणोपाय नाहीं. हें ज्ञान योग्यास कालेंकरून आपोआप होतें. भाविकास ज्ञान होतें, त्याचेहीपेक्षां जितेंद्रियास विशेष होते. ज्ञानप्राप्तीनें लवकरच अत्यंत शांति प्राप्त होते. जो ज्ञानहीन, जो भावहीन, जो संशयी, तो नाश पावतो. संशयी मनुष्यास ना इहलोक, ना परलोक त्याला कधींच सुख होत नाहीं. यास्तव योगाभ्यासानें कर्मवासना टाकून, ज्ञानानें सर्व संशय दूर करून, जो आपला आत्मा स्वाधीन ठेवितो, त्यास कर्मांची बाधा होत नाहीं. तस्मात् हे अर्जुना, अज्ञानमूलक जो हा संशय तुझ्या हृदयांत उत्पन्न झाला आहे त्याला ज्ञानखडगानें छेदून, योगयुक्त होऊन, युद्धास उभा राहा."

या चवथ्या अध्यायांत विशेषेंकरून ज्ञानाचें माहात्म्य वर्णिलें आहे, म्हणून यास ज्ञानयोग हें नांव आहे.

**अध्याय ५**–पांचव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुन म्हणतो–"कृष्णा, एकदां कर्मत्याग करावा म्हणून सांगतोस, एकदां कर्मयोग करावा म्हणून सांगतोस. या दोहींतन निश्चित कल्याणकारक मार्ग कोणचा तें सांग." त्यावर कृष्ण म्हणतो. "योगमार्ग, आणि कर्मत्याग किंवा संन्यासमार्ग, हे दोन नाहींत दोहोंचें फल एकच. योगाभ्यासावाचून संन्यास घडत नाहीं. आणि योगी सर्व बाह्यक्रिया करीत असतां आपण कांहीं करीत नाहीं, इंद्रियें आपापले विषय ग्रहण करीतात असें जाणून, कर्मफलाचा आसक्ति सोडून, चित्त परमात्म्याचे ठिकाणीं ठेवून, शरीर मन आणि बुद्धि यांच्या द्वारा होणारी सर्व कर्में आचरण करीत असले तरी कर्मत्याग होतोच. कां कीं, त्याला कर्मांपासून कांहीं बाधा होत नाहीं. ईश्वर कोणास कर्तृत्व देत नाहीं,

किंवा कर्मांची फळें भोगवीत नाहीं; कोणाकडून पाप करवीत नाहीं, किंवा पुण्य करवीत नाहीं. मनुष्य स्वभावतःच कर्माविषयीं प्रवृत्त होतो. अज्ञानानें लोक मोह पावतात. ज्ञानानें तें अज्ञान ज्यांचें नष्ट झालें त्यांत परमात्म्याचें ज्ञान स्पष्ट होतें. मग परमात्मपरायण होऊन सर्वपापरहित होत्साते ते शाश्वत सुख पावतात. जे सर्व मनुष्यांशीं समभावानें वागतात तेच जीवन्मुक्त, तेच ब्रम्हनिष्ठ. कारण ब्रम्ह सर्वाभूतीं समान आहे. म्हणून जे समदृष्टि तेच ब्रम्हनिष्ठ. जे विषयसुखाची आशा सोडून क्षणिक बाह्य दुःखापासून पीडा पावत नाहींत, ज्यास आत्म्याचें ठिकाणीं सुख होते, ते ब्रम्हनिष्ठ; त्यांतच अक्षय सुख प्राप्त होतें. जे संसारात असूनही काम क्रोधांचा वेग सहन करूं शकतात, तेच योगी, तेच सुखी. ज्यांस आत्म्याचें ज्ञान झालें, ज्यांस आत्म्याचेच ठाईं विश्रांति व सुख होते, ज्यांचें सर्व संशय दूर झालें, ज्यांचीं सर्व पापें क्षीण झालीं, जे प्राणीमात्राच्या हिताविषयीं तत्पर असतात, जे कामक्रोधरहित, ज्यानीं आपल्या मनाचा निग्रह केला, जे बाह्य विषयावरून इंद्रियें काढून प्राणवृत्तींचा निरोध करून मोक्षाची इच्छा धरून तत्पर राहातात, त्यास अत्यंत शांत ब्रम्हपद फार लौकर प्राप्त होतें. ज्यांची इच्छा, भय, आणि क्रोध हीं नाहींशीं झाली ते सदा मुक्तच होत. मी सर्व यज्ञ आणि तपश्चर्या यांचा भोक्ता, सर्व जगाचा शास्ता, सर्व प्राण्यांचा आप्त, असें मला जो जाणतो, तो शांति पावतो."

---

## अभंग

साई माझा पिता।<br>
साई माझी माता।<br>
साई सखा भ्राता<br>
जन्मांतरी ॥ १ ॥

साई माझे ध्येय।<br>
साई माझे श्रेय।<br>
साई माझे प्रेय।<br>
पृथ्वीवरी ॥ २ ॥

साई माझी शक्ति।<br>
साई माझी भक्ति।<br>
साई हीच मुक्ति।<br>
या संसारी

—कवी मगदूम

याप्रमाणें या पांचव्या अध्यायात मुख्यत्वेंकरून संन्यास म्हणजे कर्मत्याग याचें लक्षण सांगितलें आहे, म्हणून यास कर्मसंन्यासयोग असें नांव आहे.

**अध्याय ६**—सहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो,–"जो कर्मफलाची आसक्ती सोडून कर्तव्यकर्म आचरतो, तोच संन्यासी, तोच योगी. जो केवळ अग्निहोत्रादि कर्मे टाकतो तो सन्यासी नव्हे. जो केवळ सर्व बाह्यक्रिया सोडतो तो योगीहि नव्हे. ज्याला संन्यास म्हणतात त्यालाच तूं योग असे जाण. कारण वासनांचा त्याग केल्यावांचून कोणी योगी होत नाहीं. कर्माचरण करितांना मनोनिग्रह होऊन सर्व विषयवासना क्षीण झाल्या, म्हणजे योगी झाला असें म्हणतात. या योगमार्गानें आपलें आपण कल्याण करावें, आपला आपण नाश करूं नये. आपणच आपला आप्त, आपणच आपला वैरी. ज्याला आपला आत्मा वश तो आपणच आपला आप्त. आत्मा ज्याच्या स्वाधीन नाहीं, तो आपणच आपला शत्रू. यास्तव मनुष्यानें सर्व बाह्यविषय तुच्छ मानून, वैषयिक सुखदुःखें, मानापमान, यांविषयीं अनासक्त होऊन, सर्व मनुष्यांचें ठायीं समभाव ठेवून, इंद्रियें जिंकून, आत्मा वश करून, चित्त शांत करून नित्य एकांती योग्याभ्यास करावा. पवित्र ठिकाणी आसन स्थिर करून त्याजवर दर्भ, वस्त्र, कृष्णाजिन, घालून त्यावर बसावें तेथें एकाग्र मन करून, शरीर ताठ ठेवून, दृष्टि नासिकाग्रीं नासिकाग्रीं लावून ब्रह्मचर्य आचरून, शांतचित्त होऊन, बुद्धि ईश्वरपरायण करून, योगाभ्यास करावा. म्हणजे अत्यंत शांत जे माझें स्थान तें प्राप्त होतें. योगाभ्यासानें खाणें, जेवणें, निजणें इत्यादि मध्यम मानानें केलें पाहिजे. निवांतस्थळीं दीप जसा निश्चल असतो, तद्वत सर्व बाह्यविषयांवरून निघून मन परमात्मरूपीं अत्यंत लीन झाले पाहिजे. अशी स्थिति प्राप्त झाली असतां तेथें जें सुख होतें तें एक योगीच जाणतो. त्या सुखापेक्षां दुसरा कोणाचाही लाभ त्याला विशेष वाटत नाहीं. जी सुखाची स्थिती प्राप्त झाली तथापि ती स्थिती सोडित नाहीं अशी जी सर्व दुःखातीत सुखाची स्थिती तिलाच योग असें म्हणावें. हा योग निश्चयानें, अक्लिष्ट मनानें साध्य करावा. सर्व वासना जिंकाव्या. मनानें इंद्रियांचा निग्रह करावा. विवेकानें आणि धैर्यानें मन आत्म्याकडे लावून सर्व विषयांवरून काढावें. असें केलें असतां सहज ब्रह्मप्राप्तीचें सुख प्राप्त होईल. ईश्वर सर्वांभुती आहे असें जाणून सर्वांभुतीं ज्याची सारखी दृष्टि बरोबर असते, जो अशा बुद्धीनें अनन्यभावें माझी भक्ति करितो, तो योगी कोणत्याही स्थितींत असला तरी त्याचा माझा वियोग कधींही होत नाहीं. आपल्यास जसें सुख किंवा दुःख होतें तसेंच सर्व प्राण्यांसही होतें असें जो जाणतो, तो ज्ञानी. तोच सर्वांहून श्रेष्ठ योगी."

इतकें ऐकून अर्जुन म्हणतो,–"कृष्णा, सर्वत्र समदृष्टि करून योग करावा म्हणून जें तूं सांगितलेंस तें कसें घडेल ? स्थिरयोग कसा होईल ? मन फार चंचळ

आहे, फार बलवत्तर आहे. त्याचा निग्रह करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधणें याप्रमाणें अत्यंत दुष्कर आहे. " कृष्ण म्हणतो,—" अर्जुना, मन निःसंशय चंचळ व वश करण्यास कठिण आहे. परंतु विषयवासना जिंकून निग्रहाविषयीं सतत अभ्यास केला असतां मनोनिग्रह होईल. पण मनोनिग्रह करणें झाल्यावांचून योग होणें कठीण असें मला वाटतें. मनोनिग्रह झाला असतां यत्नेंकरून योग साध्य होईल. " त्यावर अर्जुन म्हणतो—"कृष्णा, कोणी श्रद्धापूर्वक योगाभ्यास करीत असतां मनोनिग्रह न झाल्यानें त्याचा योगाभ्यास मध्येंच खुंटला, तर त्याची काय गति होत्ये ? त्याला योगसुखही नाहीं, आणि काम्य कर्म आचरण केलें असतां जे स्वर्गादिक लोक प्राप्त होतात तेही नाहींत. तेव्हां तो मध्येंच लटकत राहून अभ्राप्रमाणें नाहींसा होतो कीं काय ? माझा संशय तुजवांचून दूर करणारा दुसरा कोणी नाहीं. " तेव्हां कृष्ण म्हणतो, " पार्था, त्याचा इहलोकीं किंवा परलोकींही नाश होत नाहीं. कोणीही सत्कर्म आचरीत असतां दुर्गति पावत नाहीं. त्यास स्वर्गलोकाची प्राप्ति होऊन तेथें तो बहुत वर्षेंपर्यंत राहून पुनः एकाद्या पवित्र, भाग्यवान् अशा कुलीं जन्म पावतो; किंवा ज्ञान्याचे किंवा योग्याचेच कुळांत जन्म घेतो. इहलोकीं अशा प्रकारचें जन्म होणें हें फार दुर्लभच होय. तें त्याला प्राप्त झाल्यानंतर तो पूर्वजन्मीच्या अभ्यासानें आपोआप योगाभ्यासास लागतो, असें होतां होतां अनेक जन्मान्ती त्याचा योग सिद्ध होऊन त्यास मोक्षपदाची प्राप्ति होत्ये. तपस्व्यांपेक्षांही योगी श्रेष्ठ, ज्ञान्यांपेक्षांही तो श्रेष्ठ, कर्मठांपेक्षांही तो श्रेष्ठ. म्हणून हे अर्जुना, तूं योगी हो. सर्व योग्यांमध्येंही जो श्रद्धापूर्वक अनन्यचित्तानें माझी भक्ति करितो तो सर्वश्रेष्ठ होय.

याप्रमाणें या साहाव्या अध्यायांत योगाभ्यासाचा प्रकार सांगितला आहे, म्हणून यास अभ्यासयोग असें नांव दिलें आहे.

याप्रमाणें या पहिल्या षटकांत निष्कामकर्मरूप योगमार्गाचा बोध कृष्णानें अर्जुनास केला आहे. त्यांत पूर्वीं सुचविल्याप्रमाणें उपासनामार्ग आणि ज्ञानमार्ग यांचाही उल्लेख केला आहे. या साही अध्यायांचें तात्पर्य पाहिलें तर हेंच आहे कीं, आत्मा अविनाश आणि विषय नाशवंत. परमात्मा, परमेश्वर, सर्वकर्ता, सर्वशास्ता, सर्वनिधान; त्यानें जीवात्म्यास सृष्टिकाळीं जी कर्तव्यकर्में लावून दिली आहेत तीं ज्ञानाचे योगानें फलाची वासना सोडून, भक्तीनें ईश्वराचे ठाईं चित्त ठेवून करावी. म्हणजे त्यास शाश्वतसुखाची प्राप्ति होत्ये.

दुसऱ्या षटकांत मुख्यत्वेंकरून भक्तिमार्गाचा प्रकार सांगितला आहे. त्यांत—

**अध्याय ७**—याचे आरंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो, " अर्जुना, योगाभ्यासानें माझी भक्ति करून माझ्या स्वरूपाचें निश्चित ज्ञान कसें होईल तें मी तुला सांगतों.

मनुष्यांमध्यें सहस्रांत एकच योगप्राप्त्यर्थ यत्न करितो; आणि योगाभ्यासी जनांमध्येंही क्वचित् एकादाच माझें यथार्थ स्वरूप जाणतो. यास्तव त्याविषयींचें ज्ञान

व विवेक मी तुला निःशेष सांगतों. हे ज्ञान प्राप्त झालें असतां या जगांत दुसरें कांहीं जाणावयाचें रहात नाहीं. पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश, चित्त बुद्धि, आणि अहंकार हे माझ्या प्रकृतीचें आठ प्रकार आहेत. यांखेरीज एक नवेंवा प्रकार आहे, तो जीव, ज्याचे योगानें हें जग जीवन पावतें. या नऊ तत्त्वांपासून सर्व सृष्टीची उत्पत्ति होते. सर्व जगाचा आदि-अंत मी; माझ्याहून कांहीं श्रेष्ठ नाहीं. माळेचे मण्यांप्रमाणें हें सर्व जग माझ्या आश्रयानें आहे. उदकांमध्यें रस मी; चंद्रसूर्यांमध्यें तेज मी; सर्व वेदांमध्यें ओंकार मी; आकाशाचा गुण शब्द मी; मनुष्यांमध्यें उद्योग मीं; पृथ्वीमध्यें सुगंध मी; अग्नीमध्यें तेज मी; सर्व भुतांचें जीवन मी; सर्व तपस्व्यांचें तप मी; प्राणिमात्रांचें अनादि बीज मी; बुद्धिमंताची बुद्धि मी; तेजस्व्यांचें तेज मी; बलवंतांचें आसक्तिरहित बल मी; मनुष्यांचे ठाईं धर्मयुक्त काम मी; सर्व त्रिगुणात्मक जग मजपासूनच निर्माण होतें. तथापि मी गुणतीत आहे. हें त्रिगुणात्मक जग माझी माया होय. जे मला शरण येतात, तेच या मायेस तरून जातात. माझी भक्ति करणारे चार प्रकारचे लोक असतात;-१ कोणी पीडा झाली असतां माझी भक्ति करितात; २ कोणी ज्ञान व्हावें म्हणून करतात; ३ कोणी द्रव्यप्राप्तीसाठीं करितात; आणि ४ कोणी माझें स्वरूप जाणून भक्ति करितात. हे सर्वही चांगलेच. परंतु ज्ञानी भक्त सर्वांत श्रेष्ठ. तो मला अत्यंत प्रिय. मी त्याला अत्यंत प्रिय. तो मला जीवाप्रमाणें वाटतो, कारण तो मजपेक्षां आणखी कांहींएक अधिक मानीत नाहीं. मी सर्वव्यापक परमात्मा आहे, असें बहुत जन्मांतीं जाणून जो माझी भक्ति करितो, तो महात्मा अत्यंत दुर्लभ होय. मूढजन माझें वास्तविक स्वरूप न जाणून, भिन्न भिन्न भावनांनीं मला भजतात. त्यांचें फल मी त्यांना देतों. परंतु तें फार अल्प. असे भिन्न भावानें नाना देवतास भजणारे त्या त्या देवतांच्या लोकांप्रत जातात. परंतु जे माझी भक्ति करतात तेच मत्प्रदापद पावतात. ”

याप्रमाणे या अध्यायांत विवेकसीहत ज्ञान सांगितलें आहे, म्हणून यास **ज्ञानविवेक** असें नांव दिलें आहे.

**अध्याय ८**—आठवे अध्यायाचे आरंभीं अर्जुन विचारतो, ब्रम्ह म्हणचे काय? अध्यात्म म्हणजे काय? कर्म कोणते? अधिभूत तें कोणतें? व अधिदैवत कशास म्हणावे? या देहात अधियज्ञ कोण आणि मरणकाळीं योग्यास तुझें ज्ञान कसें होतें? त्यावर श्रीकृष्ण उत्तर करतो;“जो अविनाशि परमात्मा तें परब्रम्ह. आत्म्याच्या स्वभावास अध्यात्म्य म्हणतात;पृथिव्यादि सृष्टीची उत्पत्ति,याचें नांव कर्म; सर्व नाशिवंत जग हे जीवात्मा हें अधिदैवत; आणि प्राण्यांच्या देहांत अधियज्ञ म्हणजे पूज्य मी परमात्मा. अंतकाळीं माझें स्मरण करून जो देह टाकतो, तोच निश्चयें मत्पदाप्रत येतो; नाहींतर अंतकाळीं जें जें मनांत येतें त्या त्या स्थितीप्रत मनुष्य जातो. तस्मात् सदैव माझें स्मरण कर आणि युद्ध कर. मजकडे तुझें चित्त आणि बुद्धि लागली, म्हणजे निःसंशय

तूं मजपाशीं येशील. जो परमात्मा सर्वज्ञ, जो अनादिशास्ता, जो परमसूक्ष्मस्वरूप, जो जगदाधार, जो अचिंत्यरूप, जो अत्यंत प्रकाशमय, वेद ज्याची स्तुति करितात, संन्यासी योगी ज्याचे ठिकाणीं मन लीन करितात ज्याच्या प्राप्त्यर्थ ब्रम्हचारी ब्रम्हचर्य करतात, त्या प्ररमेश्वरास अन्तकाळीं, प्राणायाम करून इंद्रियें व मन यांचा निग्रह करून ओंकारउच्चारणपूर्वक सतत अभ्यासानें स्मरण करित होत्साते जे देह टाकितात, ते अविनाश सुखाचे पद पावतात. तें पद प्राप्त झालें म्हणजे मग त्यास पुनः जन्ममरणाच्या भीतीची बाधा होत नाहीं. सहस्र युगेपर्यंत ब्रम्हदेवाचा दिवस आणि तितकीच त्याची रात्र. त्याचा दिवस उगवला म्हणजे सर्व जग उद्‌भवतें रात्र झाली म्हणजें मावळतें. असें जेव्हां जग मावळते, तेव्हां जो अविनाश पुरुष जागृत राहतो तोच परमात्मा त्याची प्राप्ति होणें ही उत्तम गति होय. तेथून पुढें पुनर्जन्म नाहीं तो परमात्मा अनन्य भक्तीनेंच पावतो. दिवसास, शुल्कपक्षीं, उत्तरायणीं ज्यांचें प्राणोत्क्रमण होतें, ते ब्रह्मवेते, ब्रह्मपदाप्रत जातात. रात्रीस, कृष्णपक्षीं, दक्षिणायनीं ज्यांस मरण येतें, ते चंद्रलोकाप्रत जाऊन पुनः जन्मतात. हे मार्ग ज्या योग्यास ठाऊक आहेत तो मोह पावत नाहीं. यास्तव सदैव तूं योगाभ्यासकर. योग्यास परमपदाची प्राप्ति होणें हें फल ब्रह्मचर्य, यज्ञ, तप, दान, इत्यादि पुण्यकर्मांचें कर जें फल सांगितलें आहे, त्या सर्वांपेक्षां परमश्रेष्ठ होय.

याप्रमाणें या आठव्या अध्यायांत, अक्षर, म्हणजे अविनाश ब्रह्माचा विचार केला आहे, म्हणून यास **अक्षरब्रह्मयोग** हें नांव आहे.


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# भारतभूमीचें भाग्य

## प्रस्थानत्रयी हा धर्माचा पाया

हिंदभूमि ही परमेश्वराची लाडकी कन्या आहे. जगदीश्वरानें या आपल्या प्रियतम दुहितेला अनन्त हस्तांनीं सृष्टिसौन्दर्याचें लेणें चढविलेलें आहे. येथें भगवान सूर्यनारायण आणि शान्तकिरण सुधांशु आपल्या संपूर्ण तेजानें सारा नभःप्रान्त उजाळून टाकीत आहेत. येथें गर्द वृक्षराजीनें आवृत झालेले पर्वत अभिमानानें मान उंच करून गगनाशीं गुजगोष्टी करीत आहेत. येथें गंगा, नि कावेरी यांसारख्या विशाल पात्रांच्या खोल नद्या सारा प्रदेश सुपीक नि जलमय करून टाकीत आहेत. येथील भूमि सुजला नि सस्यशामला असून सृष्टिवैभवानें नटलेली आहे. प्राचीन कालीं आर्य लोक गंगा व यमुना यांच्या कांठच्या रमणीय प्रदेशांत वास करीत होते, तेथें तर निसर्गसौंदर्य विशेषत्वानें आहे. जात्याच हिंदु मनोवृत्ति अन्तमुर्ख आहे, त्यांत धनधान्यसमृद्धि व परकीय आक्रमणांमुळें येणाऱ्या आपत्तीचा अभाव यांमुळें पूर्वी या वृत्तीचा फार परिपोष झाला. मनाच्या अशा प्रसन्न अवस्थेंत प्रसन्नसलिला जान्हवीच्या कल्याणमय पुलिनावर वास करणाऱ्या व नगाधिराज हिमालयाच्या हिमशुभ्र शिखरांचें नित्यशः दर्शन घेणाऱ्या प्राचीन मुनींचीं मनें ऐहिकांतून अध्यात्माकडे वळलीं; आणि निसर्गाचीं भव्य व उदात्त दृश्यें सतत दृष्टीसमोर राहिल्यानें त्यांना, गंभीर नि विशाल विचार स्फुरले हे साहजिक आहे. या विश्वाचा आरंभ कशांतून झाला, त्याच्या साऱ्या व्यापाराला कशाचें अधिष्ठान आहे आणि अन्तीं याचा लय कशांत होणार आहे, इत्यादि अनेक गूढ प्रश्नांचीं जीं उत्तरें शान्त विचारान्तीं प्राचीन ऋषींना सुचलीं तीं त्यांनीं वेद, उपनिषदें, आरण्यकें आदींच्या रूपानें अमर करून ठेविलीं आहेत. सृष्टींतील विविध घडामोडींच्या मुळाशीं असलेल्या कारणांचा व क्षणभंगुर मानवी जीविताच्या हेतूचा जो उलगडा या प्राचीन संस्कृत वाङ्मयांतून केला आहे, तो पाहून आजच्या विसाव्या शतकांतल्या शास्त्रज्ञांनाहि अचंबा वाटल्यावांचून रहात नाहीं. कांहीं विशिष्ट भाग सोडून दिले तर हिंदु धर्माचें प्राचीन वाङ्मय हें अशा रीतीनें मर्मग्राही बुद्धीच्या सूक्ष्म विचारांतून निर्माण झालें असून त्याला तर्काचा भक्कम पाया आहे असें अभ्यासान्तीं आढळून येतें.

वैदिक धर्माचें प्राचीन स्वरूप केवळ यज्ञयागप्रधान व कर्मकाण्डात्मक होतें. वेदांमध्यें वर्णिलेले यज्ञ व त्यांतील पशुहिंसा हीं मानवी बुद्धीच्या प्रथमावस्थेची निदर्शक आहेत. परंतु पुढें बुद्धि जसजशी अधिक प्रगल्भ व तर्क अधिक सूक्ष्म होत गेला,

तसातसा त्या यज्ञांचा फोलपणा ध्यानांत येत गेला. मोक्षप्राप्ति होणें वा जन्ममरणाच्या फेऱ्यांमधून सुटका होणें हा मनाच्या व आत्म्याच्या शुद्धतेचा प्रश्न आहे. ती मनाची शुद्धता व आत्मस्वरूपाची ओळख यज्ञांत केलेल्या पशूंच्या हननानें व घृतादिकांच्या आहुतीनें कशी होणार अशी साहजिकच शंका निर्माण होऊन इंद्रियें, त्यांच्या वासना व विषय, मन बुद्धि, आत्मा आदींच्या परस्पर संबंधाविषयीं सूक्ष्म विचार सुरू झालें, व त्यांतून उपनिषदांचें तत्त्वज्ञान जन्म पावलें. हीं उपनिषदें निरनिराळया ऋषींनीं निरनिराळया कालीं लिहिलेली आहेत आणि त्यांत कित्येक ठिकाणीं परस्परविरोधी विचारहि व्यक्त झालेले आहेत. प्रवृत्तिमार्ग व निवृत्तीमार्ग हे वैदिक धर्मांचे दोन महत्वाचे पंथ आहेत. त्यांच्या स्वरूपाचें अधिक स्पष्टीकरण पुढें करतां येईल; परंतु सध्या इतकेंच ध्यानांत ध्यावयास पाहिजे कीं, 'ईशावास्या' सारखीं एकदोन उपनिषदें स्पष्टपणें प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करणारी असलीं तरी बहुतेक सर्व उपनिषदें निवृत्तिमार्गाची प्रतिपादक आहेत. या सान्या उपनिषदांमधील परस्परविरोध काढून टाकून त्याची एकवाक्यता करण्यासाठीं बादरायण व्यासांनीं वेदान्तसूत्रें लिहिलीं आहेत. अर्थात तींहि उपनिषदांप्रमाणेंच निवृत्तिमार्गाची प्रवर्तक आहेत. परंतु प्राचीन आर्य-धर्मामध्यें निवृत्तिधर्माप्रमाणेंच प्रवृत्तिमार्गहि तितक्याच महत्वाचा मानला जात होता. निवृत्तिमार्गाचें भरपूर स्पष्टीकरण उपनिषदातून व वेदान्तसूत्रामधून झालें होते.

---

# साई माऊली

सुखाची सावली।  
माझी साई माऊली ॥ ध्रु ॥  
जळत्या उन्हाचा।  
भोग या भवाचा  
घास तो कृपेचा।  
प्रेमे मुखी घाली ॥ १ ॥

साई माझी शक्ति।  
साई हीच युक्ति।  
उजळली भक्ति।  
माझ्या मनाच्या राऊळी ॥ २ ॥  
सुखाची सावली।  
माझी साई माऊली ॥

—कवी मगदूम

वैदिक धर्माचे प्रमुख ग्रंथ म्हणून एवढे दोनच ग्रंथसमूह राहिले असते, तर सनातन धर्माचें स्वरूप तितकें लंगडें राहिलें असतें. कारण 'साधनानेमकता' हें या आर्य धर्माचें वैशिष्ट्य आहे. हें प्रवृत्तिमार्गाचें स्पष्टिकरण भगवान श्रीकृष्णानीं श्रीमद्भगवत-गीतेंत केलें आणि त्यामुळें उपनिषदें व वेदान्तसूत्रें या निवृत्तिमार्गप्रतिपादक ग्रंथां-बरोबरच प्रवृत्तिमार्गप्रतिपादक भगवद्गीतेलाहि तितकेंच महत्त्वाचें स्थान या वैदिक धर्मात प्राप्त झालें. उपनिषदें व वेदान्तसूत्रें व भगवद्गीता या त्रयीला 'प्रस्थानत्रयी' असें अभिधान आहे आणि ही प्रस्थानत्रयी या सनातन वैदिक धर्माचा पाया आहे.

हिंदु मनोवृत्ति ही स्वभावतःच अंतर्मुख मनोवृत्तिची आहे हें म्हटलेंच आहे. ऐहिक गोष्टींपेक्षा पारलौकिक गोष्टींकडे हिंदुमनाचा अधिक कल असतो. जगाच्या नाशवंत व्यवहारात फारसे लक्ष न घालता शाश्वत आत्मकल्याणाकडेच सारे लक्ष द्यावयाचे ही वृत्ति बळावली होती. गौत्तमबुद्धाच्या जगच्छून्यवादी व संन्यासवादी तत्वज्ञानाचा पगडा साऱ्या भारतखण्डावर बसला, त्यावेळीं येथून बौद्धधर्माचें उच्चाटन करून पुन्हा वैदिक धर्माची प्रतिस्थापना करण्याचें महत्कार्य श्रीमत् शंकराचार्य व कुमारिल भट्ट यांनीं केलें हें खरें असलें तरी शाक्यमुनिप्रणीत संन्यासमार्गीय तत्व-ज्ञानाचा लोकांच्या मनावर खोल परिणाम झाला; आणि त्यामुळें वैदिक धर्मामधील निवृत्तिमार्गीय तत्त्वज्ञानास इतकें प्राधान्य मिळालें कीं प्रवृत्तिमार्गाचा कांहीं उपदेश या धर्मात आहे, याचेंहि विस्मरण झालें. प्रथम ब्रम्हचर्य व विद्याभ्यास, नंतर गार्हस्थ्य व संसारसुखाचा उपभोग मग वानप्रस्थ व ऐहिक गोष्टीपासून अलिप्तता आणि त्यानंतर सर्वांत शेवटीं ऐहिक सुखाचा भरपूर उपभोग घेतलेल्या जगांतील सारीं कर्तव्यें पार पाडून मुक्त झालेल्या व समचित्त अशा वृद्धासाठींच संन्यास ही जी मानवी जीवनाची तर्कशुद्ध मांडणी होती ती मोडून जाऊन 'यदऽहरेव प्रव्रजेत।' असा प्रकार सुरू झाला. अशाप्रकारच्या एकंदर वातावरणात प्रस्थानत्रयीवर व त्यामुळें भगवद्गीतेवर जीं अनेक भाष्यें व टीका लिहिल्या गेल्या, त्या साऱ्या निवृत्तिमार्गीय दृष्टिकोनांतून लिहिल्या गेल्या. भगवद्गीतेचे खरें स्वरूप व त्याबरोबरच वैदिक धर्माचेंहि खरे स्वरूप लोकांच्या दृष्टिआड झालें व केवळ निवृत्तिमार्गाचाच हिंदुधर्मात उपदेश आहे. असा सर्वसाधारण ग्रह होऊन बसला आहे श्रीभगवद्गीतेचें हे सांप्रदायिक स्वरूप काढून टाकून तिला मूळच्या शुद्ध प्रवृत्तिमार्गप्रतिपादक स्वरूपात लोकांच्या पुढें आणण्याचें कार्य अत्यन्त पद्धतशीर रीतीनें आधुनिक कालांत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनींच आपल्या सुप्रसिद्ध 'गीतारहस्य' या ग्रंथाच्या द्वारां केलें. श्रीमद्भगवद्गीता ही संन्यासाची प्रतिपादक नसून कर्मयोगाची प्रतिपादक आहे, निवृत्तीची उपदेशक नसून प्रवृत्तीची उपदेशक आहे, आत्मस्वरूपाची ओळख करून घेण्यास जगांतील साऱ्या कर्मांचा त्याग करून अरण्यांत जाऊन संन्यस्तवृत्तीनें राहिलें पाहिजे असें सांगणारी नसून, या जगाच्या व्यवहारांत राहून संसार करीत

आपलीं सर्व कर्तव्यें पार पाडूनहि मनुष्याला आपल्या मोक्षाचा मार्ग चोखाळता येतो असें सांगणारी आहे किंबहुना अशा रीतीनें मनुष्याला ऐहिक उन्नतीपासून पराङ्मुख होऊं न देतां ऐहिक वैभव मिळवून, या जगांतील सर्व पुरुषार्थ संपादून व हें सर्व करीत असताना साऱ्या व्यवहारांत अलिप्त बुद्धीनें वावरून आत्म्याची उन्नति कशी करून घ्यावी, हे सांगणारी असल्यानेंच श्रीमद्‌भगवद्‌गीता आजच्या भौतिकशास्त्र-प्रधान विज्ञानयुगातहि हिंदुंचा 'धर्मग्रंथ' म्हणून मान्यता पावण्यास योग्य आहे.

धर्माची मुख्य अंगें दोन आहेत. एक तत्वज्ञान व दुसरें आचार. हे विश्व कशांतून निर्माण झालें, त्याचें अंतिम पर्यवसान कशांत होणार आहे, सृष्टीची उत्पत्ति कशी झाली, आत्म्याचें स्वरूप काय आहे. परमात्मा व जीवात्मा या दोघांचा परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचा आहे, सभोंवतालीं इंद्रियांना भासमान होणाऱ्या व प्रतिक्षणीं बदलणाऱ्या नाशवंत वस्तूंत शाश्वत व चिरन्तन असें काय आहे, हें सारें विश्व निर्माण करण्यांत त्या जगन्नियंत्याचा कोणता हेतु आहे, मानवी जीवनाची पूर्णता कशांत आहे, अशा अनेकविध गहन प्रश्नांचा ऊहापोह धर्माच्या तत्त्वज्ञानात्मक भागांत केलेला असतो. आणि या जगांत मनुष्याची अवश्य पालनीय कर्तव्यें कोणती, त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं कसें वागावें, समाजासाठीं, कुटुंबासाठीं व स्वतःसाठीं त्यानें काय काय करावें, चित्तशुद्धिसाठीं त्यानें कोणते यमनियम पाळावेत, त्याचीं नित्य कर्में कोणतीं नैमित्तिक कर्में कोणतीं त्याचप्रमाणें निषिद्ध कर्में कोणती वगैरे केवळ आचरणात्मक भागाचा अंतर्भाव आचारांत होतो. तत्वज्ञान हा बुद्धीचा विषय आहे. तर आचार

## साई भक्तांस अपूर्व सवलत

श्री साई लीला मासिकांचे १९५९ पासून–१९६५ मार्च पर्यंतचे थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक आहेत. प्रत्येकीं दोन आण्या-प्रमाणें मिळतील; पोष्टेज निराळे. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, दोन अंकास १५ पैसे, तीन अंकास २० पैसे, चार अंकास २५ पैसे.) पोष्टाचा तिकीटखर्च वरीलप्रमाणें स्टँप–तिकिट अगर मनीऑर्डरनें पाठवावे.

जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह पाठवावी.

व्यवस्थापक

**श्री साईलीला मासिक**

हा मनादि इंद्रियांचा विषय आहे. तत्वज्ञानाचें स्वरूप विचारात्मक आहे तर आचाराचें स्वरूप क्रियात्मक आहे. तत्वज्ञान हें ब्रम्हांडांतील व अंतःसृष्टींतील सूक्ष्म नि विविध घडामोडींच्या परिशीलनांतून निर्माण होतें, तर आचार हा त्या परिशीलनांतून निर्माण होणाऱ्या सृष्टीकडे पाहण्याच्या विशिष्ट दृष्टिकोनामधून जन्म घेतो. तत्वज्ञान हा आचाराचा अमूर्त पाया असतो तर आचार हा त्या अमुर्त तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष अविष्कार असतो. तत्वज्ञान हें नित्य स्थिर स्वरूपाचें असून त्याचें सिद्धान्त त्रिकालाबाधित असतात, तर आचार हा देशकाल परिस्थिति सापेक्ष व परिवर्तनीय असून भोंवतालची परिस्थिति व समाजाची धारणा ही जशी बदलते तसें त्याचें स्वरूपहि बदलत जातें. तत्त्वज्ञाने आणि आचार या धर्माच्या दोन भागांतून तत्त्वज्ञानाचा भाग अधिक महत्त्वाचा आहे. कारण आचाराच्या अनुरोधानें तत्त्वज्ञानाची उभारणी होत नसते, तर तत्त्वज्ञानाला अनुसरून आचाराचें स्वरूप ठरत असतें.

जगाच्या सामान्य व्यवहारांत मनुष्यानें कसें वागावें हें त्या समाजाच्या मानवी जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरून ठरत असतें; आणि हीं मानवी जीविताकडे पाहण्याची दृष्टि त्याला एकंदर विश्वाच्या व्यापाराच्या निरीक्षणांतून निर्माण होणाऱ्या तत्त्वज्ञानांतून मिळत असते.

तत्वज्ञान हा बुद्धीचा विषय आहे हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् ज्या समाजाची बुद्धि ज्या प्रमाणांत प्रगल्भ नि सूक्ष्म असेल, त्या प्रमाणांत त्या समाजाचें तत्वज्ञान खोल नि विशाल असतें. मानवसमाजाच्या आद्यावस्थेंत जेव्हां मानवानें या सृष्टींतील विविध वस्तूंचे व्यापार पाहिले असतील तेव्हां त्याची बालबुद्धि चकित होऊन गोंधळली असेल हें अगदीं साहजिक आहे. परंतु परमेश्वरानें मानवाला दृश्यापलीकडे जाऊन विचार करण्याची अमोलिक शक्ति दिलेली आहे. पशु व मानव या दोघानाहि बुद्धि आहे, पण त्यांच्या बुद्धींत हा महत्वाचा फरक आहे. पृथ्वीच्या पाठीवर असलेल्या अनेक सजीव नि निर्जीव वस्तु, पशु आणि मानव हे दोघेहि आज युगानुयुगें पाहत आले आहेत, पण पशूला उपजतबुद्धीच्या पलीकडे जाण्याची शक्ति नसल्यानें त्याच्या ज्ञानाची वाढ होऊं शकली नाहीं. घड्याळाचे एकामागून एक पडणारे दहा ठोके श्रवणेंद्रियाच्या द्वारां पशूच्याहि मेंदूवर जाऊन आदळतात; पण त्या एकामागून एक होणाऱ्या आघातांचें एकीकरण करून 'दहा ध्वनि झाले' हें समजून घेण्याची बुद्धि त्याला नाहीं. एकतेंतील विविधता समजून घेणें व विविधतेंतील एकता शोधून काढणें याला स्वतंत्र विचारशक्ति लागते, ती मानवाला आहे. त्यामुळें सभोंवतालीं घडणाऱ्या घटनांकडे शोधक बुद्धीनें पाहत राहून मनुष्य त्यांचे ज्ञान करून घेऊं शकतो; आणि पूर्वजांनीं मिळविलेल्या ज्ञानानुभवाची शिदोरी पाठीस बांधून ज्ञानमार्गावर पुढें पुढें दौड मारण्याच्या त्याच्या शक्तीमुळें त्यांच्या बुद्धीची ही मर्मग्राहकता दिवसेंदिवस अधिक तीक्ष्ण होत जाते. जसजशी ही बुद्धीची तीक्ष्णता वाढत जाते, तसतशी ती

स्थूलांतून अधिकाधिक सूक्ष्माकडे जाऊं शकते. विशाल दृष्टिकोन घेऊन विश्वाचें अगम्य कोडें सोडविणारें सारें तत्त्वज्ञान मानवी बुद्धीच्या या सूक्ष्मतेंतून जन्म पावलें आहे. मानवाची बुद्धि ज्या वेळीं अगदींच बाल्यावस्थेंत होती त्या वेळीं आपल्या अपरिपक्व बुद्धीला अनुसरून त्यानें या सृष्टीच्या व्यापारांविषयीं अनेक चुकीच्या कल्पना बांधल्या हें साहजिक आहे. पण पुढें पुढें अनुभवानें जसजशा त्याच्या मनाच्या व बुद्धीच्या शक्ति वाढत गेल्या तसतशा त्याच्या सृष्टिविषयक कल्पनाहि अधिकाधिक सूक्ष्म होत गेल्या; आणि त्या कल्पना जसजशा सूक्ष्मतर होत गेल्या, तसतसे ही सृष्टि व स्वतः मनुष्य यांच्या परस्परसंबंधाविषयींचे त्याचे विचारहि स्पष्टतर होत गेले. मानवी बुद्धीचा जसजसा विकास होत गेला, तसतशी आध्यात्मिक तत्वज्ञानाची उत्क्रान्ति होत गेली असली पाहिजे, हें अनुमान यावरून सहज काढतां येतें. हिंदु धर्मांतील तत्वज्ञानाचा विकासहि याच पद्धतीनें होत गेला असून गीतेंत तो विकास पूर्णतेस पोहोंचला आहे. वेदकाल, उपनिषत्काल व गीताकाल या निरनिराळ्या वेळीं आर्यांचा धर्म व तत्वज्ञान यांचें स्वरूप काय होतें हें थोडक्यांत पाहिलें, तर आर्यज्ञानमंदिराची सोपानपंक्ति श्रीमद्भगवद्गीतेंत कशी कळसास पोहोंचली आहे, हें सहज ध्यानांत येईल.


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८५४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स

# फुलें व मुलें

---

सर्व देशांतील कवींनीं मुलांना फुलांची उपमा दिलेली आहे. " सान थोर हीं मुली-मुलें, प्रभूच्या बागेंतील फुलें. " फुलें कितीहि लहान असलीं तरी त्यांच्या वासानें सर्वांना आनंद होतो. मॅग्नोलियाच्या उमललेल्या एका पुष्पानें सर्व बाग दरवळून जातो. कित्येक फुलें आपल्याला घाणेरडीं अशीं वाटतात. पण दिसण्यांत घाणेरडें असणाऱ्या फुलाचें बारकाईनें निरीक्षण केल्यास त्याच्या ठिकाणीं दिसून येणारी परमेश्वराची करामत पाहून त्या जगदीशाला धन्यवाद दिल्याशिवाय आपल्याच्यानें रहाणार नाहीं. कवींनीं ज्याप्रमाणें मुलांना फुलांची उपमा दिली आहे, त्याप्रमाणें धार्मिक पुरुषांनीं मुलांना हिऱ्याची व रत्नांची उपमा दिली आहे. एका ख्रिस्ती गीतांतील खालील दोन ओळींचे ह्या क्षणीं स्मरण होतें. मुलांविषयीं हें गीत म्हणतें कीं,तीं All His Jewels, Precious Jewels, His oved and His own' अशीं आहेत. सर्व मुलें परमेश्वरानें निर्मिलेलीं रत्नें आहेत, हा विचार मनात आला म्हणजे त्यांची आपण किती काळजी घेतली पाहिजे हे आपणांस सहजच समजतें. कॉर्नेलिया नांवाची एक रोमन स्त्री आपल्या शेजारणीकडे बसावयास गेली असता. तिच्या अंगावर दागिने नसलेले पाहून त्या शेजारणीनें तिला विचारलें कीं, बाई आपण आज दागिनें नाहीं घातले ! " ह्यावर कॉर्नेलियानें आपल्या दोन मुलांना जवळ बोलावून म्हटलें, " हे पहा माझे दागिने, हे माझे दोन तेजस्वी हिरे मी बरोबर आणले आहेत. " कॉर्नेलियानें मुलांची खरोखर हिंऱ्यापेक्षा अधिक जोपासना केली होती; व हे दोघेहि मुलगे पुढें मोठे पुरुष झाले. कॉर्नेलिया मरण पावल्यावर तिच्या स्मारकाचा पुतळा उभारण्यांत आला व त्यावर " ग्रार्चीची माता कॉर्नेलिया " एवढेच शब्द खोदलेले होते. सर्व माता आपल्या सोन्यारुप्याच्या दागिन्यापेक्षा मुलांची अधिक काळजी घेतात, ह्यावरून त्यांच्या ठिकाणीं कॉर्नेलियाप्रमाणें आपल्या मुलांच्या अमूल्यत्वाची जाणीव असते हे उघड आहे. हिऱ्याचे तेज स्पष्ट होण्यासाठीं त्याला कापून त्याचे पैलू करून तकाकी आणावी लागते. हिरा खाणींतून खणून काढला म्हणजे प्रथमतः निस्तेज दगडाप्रमाणें असतो. मुलांचें तेजसुद्धां त्यांच्या बाह्य स्वरूपावर अवलंबून नसून आंतरिक गुणांवर अवलंबून असतें. मुलें मातापितरांच्या प्रेमाचें नैसर्गिक स्थान असतात, पण तीं आपल्या गुणांनीं इतरांच्याहि प्रेमाचें स्थान होऊन रहातात. लहान मुलें आपल्याला मोठे ज्ञाते समजणाऱ्यांनाहि आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळें, न बोलतां किती महत्वाचे धडे शिकवितात बरें ! देवाधर्मावर फारसा विश्वास नसणारा एक गृहस्थ होता. तो एका

काळोख्या रात्रीं आपल्या लहान मुलीला जवळ घेऊन निजला असतां ती मुलगी जागी झाली. काळोख पडला असल्यामुळें तिला फार भीति वाटूं लागली. तेव्हां तिनें बापाला जागें करून म्हटलें. "बाबा मला भीति वाटते. माझा हात तुम्ही आपल्या हातांत धरा." बापानें तसें करतांच त्या मुलीची भीति नाहींशी झाली व तिला पुन्हा चटकन् झोंप लागली. तिला झोंप लागली खरी पण बापाच्या मनात विचारांचें काहूर माजून राहिलें. शेवटीं त्याला कळून आलें कीं आपली भीति नाहीशीं होण्याला आपणहि परमेश्वराला आपला हात धरून ठेवण्याला विनविलें पाहिजे, त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवला पाहिजे, म्हणजे सर्व जीवन शांतिमय होईल. मुलांचा साधा आहे, भोळा भाव सर्वश्रुत आहे. ख्रिस्तानें म्हटलें कीं, स्वर्गाचें राज्य मुलांप्रमाणें जे निष्पाप, साध्या वृत्तीचे, सरळ भावाचे असतात अशांचें आहे. तुकारामबुवांनीं अनेक वेळां मुलांप्रमाणें आपल्या अंतःकरणाचा भाव शुद्ध असण्यासाठीं परमेश्वराची प्रार्थना केलेली आहे. ह्याप्रमाणें मुलें आपल्याला प्रेम करण्याला, विश्वास ठेवण्याला, निष्पाप वृत्ती राखण्याला शिकवीत असतात. आजचीं मुलें देशाचें भावी आधारस्तंभ आहेत. ते तसें व्हावे म्हणून मातापितरांनीं नातेवाई-कांनीं व मित्रांनीं त्यांचें प्रेमानें संवर्धन केलें पाहिजे. स्वर्ग म्हणून एकादी विशिष्ट जागा आहे, असें नसून आनंद, पावित्र्य, प्रेम, निरलसता, सालसपणा इत्यादि गुणांनीं युक्त असें स्थळ होय. हेंच स्वर्गीय राज्य. हें राज्य पृथ्वीवर प्रस्थापन करावयाचें अस-ल्यास मुलांच्या आंगच्या गुणांचा शुद्ध पक्षांतील चंद्राच्या कलांप्रमाणें विकास झाला पाहिजे हें करणें सर्वस्वीं वडील माणसांच्या हातीं असल्यामुळें त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्न करावा म्हणजे ध्येयप्राप्ती झाल्याविना रहाणार नाहीं.

—पावसाचें पाणी प्रथम उंच डोंगर, पर्वतांवर पडतें आणि नंतर तें कोसळत कोसळत खालीं येतें. त्याचप्रमाणें सुविचार प्रथम बुद्धिवान् माणसांच्या मनांत उद्भ-वतात व त्यांच्याद्वारें ते आस्ते आस्ते खालपर्यंत पसरत जातात.

—इमर्सन

—वाणीला सौंदर्य केव्हां प्राप्त होतें ? सत्य, प्रिय व हितकर व जरूर तें बोलल्यानें.

—आम्हीं आपलें मन सुंदर बनविलें पाहिजे. मनांत सुंदर विचार आले म्हणजे ते वाणीच्याद्वारें बाहेर पडतात.

# कर्मसंन्यासाचें स्पष्टीकरण

—संत विनोबा

एखादा मनुष्य रागावतो. आपल्या चुकीबद्दल रागावला तर आपण त्याच्याकडे जातों. पण तो बोलणेंच सोडून देतो. त्याच्या न बोलण्याचा, त्या कर्मत्यागाचा, केवढा प्रचंड परिणाम होतो ! दुसरा एखादा तडातड बोलेल. दोघेहि रागावलेलेच. परंतु एक मुका आहे व दुसरा बोलता आहे.दोन्हीं रागाच्याच तऱ्हा. न बोलणेंही सुद्धां रागावण्याचीच तऱ्हा. त्यानेंहि कार्य होत असतें. बापानें किंवा आईनें मुलाशीं बोलणेंच सोडलें तर त्याचा परिणाम केवढा प्रचंड होतो ! तें बोलण्याचें कर्म टाकणें, तें कर्म न करणें, यामुळेंच एवढें प्रचंड कर्म होतें की तेवढा परिणाम प्रत्यक्ष कर्म केलें असतें तर त्याचाहि होता ना. त्या अबोलण्याचा जो परिणाम झाला, तो बोलण्यानें होणें शक्य नाहीं. ज्ञानी पुरुषाचें असेंच आहे, त्याचे अकर्म, त्याचे स्वस्थ बसणे, प्रचंड कर्म करीत असतें. प्रचंड सामर्थ्य उत्पन्न करतें. अकर्मी राहून तो इतकें कर्म करतो कीं तितकें क्रियेनें प्रगटच होणार नाहीं. अशीं ही संन्यासाची दुसरी तऱ्हा आहे.

अशा संन्याशाचे सारे खटाटोप, सारे उद्योग एका आसनावर येऊन बसतात.

“ उद्योगाची धांव बैसली आसनीं
पडिलें नारायणीं मोटळें हें ।
सकळ निश्चिंती झाली हा भरंवसा
नाहीं गर्भवासा येणें ऐसा ।
आपुलिये सत्ते नाहीं आम्हां जिणें
अभिमान तेणें नेला देवें ।
तुका म्हणे चळे एकाचिये सत्ते
आपुले मी रितेपणें असें ॥ ”

तुकाराम म्हणतात, “ मी आतां रिकामा आहें, पोतें होऊन पडलों आहें. सर्व उद्योग समाप्त झाले. ” तुकाराम रिते आहेत; परंतु त्या रित्या पोत्यांत प्रचंड शक्ति आहे. सूर्य स्वतः कांहीं हांकारे करीत नाहीं; परंतु तो दिसतांच पांखरें उडूं लागतात, कोंकरें नाचूं लागतात, गाई रानांत चरावयास निघतात, व्यापारी दुकानें उघडतात, शेतकरी शेतांत जातात, जगांतील नाना व्यवहार सुरू होतात. सूर्य आहे मात्र. तो असला म्हणजे पुरे. अनंत कर्में सुरू होतात. ह्या अकर्मावस्थेंत अनंत कर्मांची प्रेरणा

भरून राहिलेली असते. सामर्थ्य खच्चून भरलेलें असतें. अशी ही संन्यासाची दुसरी अद्भुत तऱ्हा आहे.

पांचव्या अध्यायांत संन्यासाच्या दोन तऱ्हांची तुलना केलेली आहे. एक चोवीस तास कर्म करूनहि कांहींच करीत नाहीं, व दुसरा क्षणभरहि कर्म न करून सर्व करतो. एक बोलून न बोलण्याची तऱ्हा, तर दुसरी न बोलून बोलण्याची तऱ्हा. अशा या दोन प्रकारांची येथें आतां तुलना आहे. या ज्या दोन दिव्य तऱ्हा त्यांचें अवलोकन करावें, त्यांचा विचार करावा, मनन करावें, यांत अपूर्व आनंद आहे.

हा विषयच अपूर्व व उदात्त आहे. खरोखरच ही संन्यासाची कल्पना फारच पवित्र व भव्य आहे. ज्यानें हा विचार, हीं कल्पना प्रथम शोधून काढली त्याला किती धन्यवाद द्यावेत ? ही आहे उज्ज्वल कल्पना. आजपर्यंत मानवी बुद्धीनें, मानवी विचारानें, ज्या कांहीं उंच अशा उड्या मारल्या त्यांतील सर्वांत उंच उडी ती या संन्यासापर्यंत गेली. त्यापलीकडे अजून कोणी उडी मारली नाहीं. उड्या मारणें चाललेंच आहे. परंतु विचाराची व अनुभवाची इतकी उंच उडी कोणी मारल्याचें मला माहीत नाहीं. या दोन तऱ्हांनीं युक्त असलेल्या संन्यासाची नुसती कल्पनाहि डोळ्यांसमोर आणण्यांत आनंद, अपूर्व आनंद, आहे. भाषेच्या व व्यवहाराच्या जगांत आलें म्हणजे तो आनंद कमी होतो. खालीं पडल्यासारखें वाटतें. मी माझ्या मित्रांजवळ यासंबंधीं नेहमीं बोलतों. आज कित्येक वर्षें या दिव्य विचारांचें मी मनन करीत आहे. येथें भाषा अपुरी पडते. शब्दांच्या कक्षेंत हें येतच नाहीं.

न करून सारें केलें व सारें करून लेशमात्रहि नाहीं. केवढी उदात्त, रसमय व काव्यमय कल्पनाहि ! आणखी काव्य तें काय राहिलें ? काव्य काव्य तें सारें या काव्यासमोर फिकें आहे. या कल्पनेंत जो आनंद, जो उत्साह, जी स्फूर्ति व जी दिव्यता आहे ती कुठल्याहि काव्यांत नाहीं असा हा पांचवा अध्याय खूप ऊंचच ऊंच भरारी अशा भूमिकेवर बसविला आहे. चौथ्या अध्यायापर्यंत कर्म विकर्म सांगून येथें खूप ऊंच भरारी मारली. येथें अकर्मदशेच्या दोन प्रकारांची प्रत्यक्ष तुलनाच केली. येथें भाषा लटपटते. कर्मयोगी श्रेष्ठ कीं कर्मसंन्यासी श्रेष्ठ ? कर्म जास्त कोण करतो हें सांगणें शक्यच नाहीं. सर्व करून कांहीं न करणें, आणि कांहीं न करतां सर्व करणें. दोन्ही योगच, परंतु तुलनेसाठीं एकाला योग म्हटलें व दुसऱ्याला संन्यास म्हटलें.

आतां ह्यांची तुलना कशी करावयाची ? कांहीं तरी उदाहरणें देऊनच ती करावी लागेल. उदाहरण देऊन सांगतांना खालीं पडल्यासारखें वाटतें. परंतु खालीं आलें पाहिजे. खरोखर पाहिलें तर पूर्ण कर्मसंन्यास किंवा पूर्ण कर्मयोग या कल्पना अशा आहेत कीं, त्या या देहांत मानणार नाहींत. त्या कल्पना हा देह फोडून टाकतील. परंतु या कल्पनांच्या जवळ जवळ गेलेल्या महापुरुषांचीं उदाहरणें घेऊन पुढें चलायचें. उदाहरणें म्हटलीं कीं तीं अपूर्णच असायचीं. पण तींच पूर्ण आहेत असें घटकाभर समजायचें.

जसें भूमितीमध्यें म्हणतात ना कीं सा, रे, ग हा त्रिकोण आहे असें "समजा." समजा कां? कारण या त्रिकोणांतील रेखा यथार्थ रेखा नाहींत म्हणून. रेखेची मुळीं व्याख्याच अशी आहे कीं तिला लांबी आहे, पण रुंदी नाहीं. ही रुंदीशिवाय लांबी फळ्यावर काढावयाची कशी? लांबी आली कीं रुंदी आलीच. जी रेषा काढाल तिला थोडी तरी रुंदी राहणारच. म्हणून भूमितिशास्त्रांत रेखा 'मानल्या' शिवाय चालतच नाहीं. भक्तिशास्त्रांत असेंच नाहीं का? तेथेंहि या लहानशा शालिग्रामाच्या पिंडींत सर्व ब्रह्मांडाचा धनी आहे असें 'माना', असें भक्त म्हणतो. कोणी जर म्हणेल हें काय खूळ? तर त्याला सांगा, तुझें हें भूमितीचें काय खूळ आहे? चांगली ठसठशीत जाड रेघ दिसत आहे व म्हणे, "ही रुंदीशिवायची माना." हें काय खूळ आहे? सूक्ष्मदर्शकांतून पाहिलें तर अर्धा इंच रुंद दिसेल. जसें तुम्ही तुमच्या भूमितींत मानतां तसेंच भक्तिशास्त्र म्हणते कीं माना, या शालिग्रामांत परमेश्वर माना. "परमेश्वर तर तुटत नाहीं. फुटत नाहीं. तुमचा शालिग्राम तर फुटेल. घाव घालूं?" असें जर कोणी म्हणेल तर तें विचाराचें ठरणार नाहीं. भूमितींत मात्र "माना" चालतें; मग भक्तिशास्त्रांत कां चालूं नये? बिंदु म्हणे माना. आणि फळ्यावर बिंदु काढतात. बिंदु कसचा, तें एक चांगले वर्तुळच असतें. बिंदूची व्याख्या म्हणजे ती ब्रह्माचीच व्याख्या. बिंदूला लांबी. रुंदी, जाडी, कांहींच नाहीं; परंतु अशी त्याची व्याख्या करून फळ्यावर मात्र तो काढतात बिंदु तर केवळ अस्तित्वमात्र आहे. त्रिपरिणाम-रहित आहे. सारांश, खरा त्रिकोण, खरा बिंदु, हें व्याख्येंतच आहेत. परंतु आपणांस गृहीत धरावें लागतात. भक्तिशास्त्रांतहि शालिग्रामांत न फुटणारा सर्वव्यापी देव मानावा लागतो. आपणहि तसेच काल्पनिक दृष्टान्त घेऊन त्यांची तुलना करावयाची.

---

—अभय, असंग व अविद्या हीं भारतीय ज्ञानभांडाराचीं तीन महत्त्वाचीं व मौल्यवान् तत्त्वें आहेत. अनेक शतकें लोटलीं तरी आम्हीं उंच मान करून उभे आहोंत याचें मूलभूत कारण हीं तीन तत्त्वें.

—डॉ. राधाकृष्णन्



# अकरा श्लोकांत गीतेचें सारसर्वस्व

******************************

— श्री. आप्पाराव

**गीता हा आपला सर्वश्रेष्ठ अध्यात्मिक ग्रंथ आहे. अर्जुनाच्या मनांत व्यामोह निर्माण झाला असतां तो दूर करण्यासाठीं श्रीकृष्णानें गीतेच्या रूपानें त्याला जें जीवन-व्यापी व बहुमोल तत्वज्ञान सांगितलें तें सर्व काळांतील सर्व लोकांना जीवनभर उपयोगी पडणारें मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे.**

त्या ग्रंथांतील प्रत्येक श्लोक महत्त्वाचा असला तरी गीताभ्यासी अशा एका थोर पुरुषानें त्यांतील फक्त अकरा श्लोक निवडून काढून ते सर्वांपुढें ठेविले आहेत. त्या अकरा श्लोकांचा जरी आपण सखोल विचार व आचार केला तरी आपण आपला जीवनोद्देश साध्य व सफल करूं शकूं.

त्या महत्त्वपूर्ण अकरा श्लोकांचा येथें उल्लेख व विचार करावयाचा आहे.

**पुस्तकी पांडित्य**

या जगांत असे किती तरी लोक आहेत कीं ज्यानी धार्मिक प्रश्नांचा व अध्यात्माचा विचार व वाचन मुबलक प्रमाणांत केलेलें असतें. ते त्या विषयावर बोलू लागले म्हणजे खूप बोलतील, दुसऱ्याला बोलूं देणार नाहींत. त्यांची वाक्-शक्ति फार दांडगी असते. तें तत्त्वज्ञान मात्र त्यांच्या आचरणांत कुठवर आलेलें असेल याबद्दल शंका घेतल्यास ती अनाठायीं होणार नाहीं. त्यांची व ऐहिक लोभाची बिलकूल फारकत झालेली नसते. ते ज्ञानी असल्यामुळे पांडित्य गाजवूं शक-तात; परंतु त्यांच्या आचरणांत त्या ज्ञानाचा शिरकाव झालेला नसतो. त्या दृष्टीनें ते कोरडेच असतात. ते जीवनांत सुखदुःखाच्या आहारीं जातात. त्यांनीं इंद्रियावर राग, लोभादि दुर्गुणावर ताबा मिळविलेला नसतो.

अर्जुनासारख्याची मोहविवश झाल्यामुळें काय स्थिति झाली ती आपण समजूं शकतो. त्यासाठीं तर गीता जन्माला आली, व अर्जुनाला मोहमुक्त होणें शक्य झालें.

**मृत्यूचें भय**

प्रत्येक मनुष्याला सर्वांत जास्त भय जर कशाचें वाटत असेल तर ते मृत्यूचें !

त्याला वाटत असते कीं, एके दिवशीं मला मरण येणार; माझे नातेवाईकही मरणार! मग माझ्याशिवाय इतरांचें कसें बरें होणार! हाच तर आपल्याला चिकटून राहिलेला सर्वांत मोठा मोह आहे. गीता काय सांगते? मी म्हणजे कोण? हें शरीर, त्यांत वास करणारीं इंद्रियें, का मन आणि बुद्धि? नाहीं. या सर्वांना पुरून उरलेला आत्मा म्हणजेच मी. शरीर व शरीरांत वास करणाऱ्या सर्व वस्तु नाशवंत असल्या तरी आत्मा नाशवंत नाहीं. तो अमर आहे. याची सतत जाणीव ठेवून आपण कोणाहीबद्दल दुःख करणें सोडून दिलें पाहिजे.

हें शरीर नाशवंत आहे. संसार परिवर्तनशील आहे. शरीर शाश्वत नाहीं तसाच संसार व संसारांतील कोणतीही वस्तु शाश्वत नाहीं. आपण वस्त्र जुने झालें म्हणजे तें फेकून देतों व नवें वस्त्र धारण करतों, तसेंच या शरिराचें आहे. आत्मा सतत एकाच शरिरांत कधींही रहात नाहीं. आपण सदा सर्वकाळ एका वस्त्रावर अवलंबून रहातों का? तसेंच आहे आत्म्याचें. वस्त्र बदलावें लागतें त्याचप्रमाणें आत्म्याला शरीर बदलावें लागतें तेव्हां गीता सांगते कीं—

> प्रज्ञापापान निराकृत्य गीतागुह्यं प्रगृह्यताम्
> नैवनाशो निवासो वा कस्यचिदिति निश्चितम् ॥ १ ॥

## वाळूची भिंत कोसळायचीच

शरीर हें मरणाधीन आहे. तें एक दिवस नाश पावायचेंच. तें कोण थांबवूं शकणार? वाळूची भिंत! ती कोसळून पडायचीच! ती कोण सांवरून धरणार? त्याचप्रमाणें मरणारा मरणारच. पंचतत्वांपासून बनलेलें हें शरीर शेवटीं पंचतत्वांतच विलीन व्हायचें. त्यासाठींच तर या लोकाला मृत्यूलोक म्हणतात. हा मरणारांचा मुलख आहे. येथें अशी कोणती वस्तु किंवा व्यक्ति आहे कीं जी अमरपट्टा घेऊन आली आहे? त्याचप्रमाणें आपल्याठायीं वास करणारा आत्मा हा अमर आहे. त्याला कोण मारूं शकणार आहे?

> नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
> न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः॥

याला कोणतेंही शस्त्र कापूं शकत नाहीं. अग्नीदेव जाळून भस्म करूं शकत नाहीं. पाणी त्याला बुडवूं शकत नाहीं व त्याला हवाही सुकवूं शकत नाहीं तो अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य तसेंच अशोष्य आहे. आत्मा कोणाला मारीत नाहीं, व तो मरतही नाहीं. सत्य तें त्रिकाल सत्यच राहणार. असत्य तें असत्य. नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत; असत्य हें जसें कधीं सत्य होणार नाहीं, त्याचप्रमाणें सत्य हेंही कधींकाळी असत्य होणार नाहीं.

## आत्म्याचें अमरत्व

आत्म्याला जन्म नाहीं, मरण नाहीं. तो अमर आहे. एखाद्या शरीराशी त्याचा संबंध येतो तेव्हां त्याला म्हणतात जन्म. मातीचा घडा बनविला जातो. तो मग कधीं तरी फुटतो. त्याला त्याचा जन्म झाला व त्याला मरण आलें असें ज्याला म्हणायचें असेल त्याला खुशाल म्हणूं द्या; परंतु जे विचारवंत आहेत ते जाणतात कीं तो घडा प्रथम माती होता व नंतरही मातीच झाला.

म्रियमाणं हि को रक्षेत् कोऽवध्यं हन्तु मर्हति ।
असदसाद्धि सत्सच्च जन्म मृत्युर्न तत्त्वतः ॥

देश, काल, वर्ण, आश्रम, अवस्था व परिस्थिति यांस अनुसरूनत जें करणें प्राप्त असेल, लोककल्याणाच्या दृष्टीनें जें कांहीं करणे आवश्यक असेल तें ईश्वरी आज्ञा समजून आपण केलेंच पाहिजे. त्यांत टाळाटाळ करणें योग्य होणार नाहीं. मग त्या कार्याला युद्धाचें स्वरुप येवो किंवा स्वजनाशीं झगडा करण्याचें स्वरुप येवो; तें कर्तव्यबुद्धीनें आपण पार पाडलेंच पाहिजे. कर्तव्यकर्म—जें करण्यायोग्य काम तें आपण केलेंच पाहिजे. त्यांत चुकारपणा करून चालणार नाहीं. तें उत्तम प्रकारें पार पाडण्याची एक पद्धत आहे.

असें पहा कीं, वीष हें घातक व मारक असतें कीं नाहीं ? परंतु औषधाशीं त्याचा योग्य प्रमाणांत मिलाफ केला असतां तें अमृततुल्य होऊं शकतें. तें मग प्राणघातक नाहीं तर प्राणरक्षक होऊं शकतें. त्याचप्रमाणें कोणतेंही कर्म जरी बंधनकारक असलें तरी गीतेंत सांगितलेल्या योगानुसार जर तें करण्यांत आलें तर त्यांतील बंधन नाहींसें होतें एवढेंच नव्हे तर तें आपणास परमानंदाची प्राप्ति करून देणारे होऊं शकतें. त्याचद्वारें आपण भगवंताचें पूजन करूं शकतों व तसें करणें हें आपणास मोक्षदायक होऊन रहात असतें 'सुखदुःखसमेकृत्वा—' सुख असो वा दुःख असो; दोन्हीं गोष्टींकडे समदृष्टीनें पाहतां आलें पाहिजे. यश मिळो वा अपयश मिळो. राग, द्वेष, अहंकार, माया ममता यांच्यापासून आपण मुक्त राहिलें पाहिजे. फळाची आशा कोणत्याही परिस्थितींत बाळगायची नाही.

## न्यायाधिशाची भूमिका

हेंच पहा ना. न्यायाधीश जेव्हां न्यायासनावर बसतो तेव्हां कोणीही गुन्हेगार किंवा अपराधी असो; त्याच्याबद्दल त्याच्या मनांत राग, द्वेष कांहीं नसतें. तो पक्षपात करीत नाहीं. ज्याचा जसा गुन्हा असेल त्याप्रमाणें त्याला तो शिक्षा देतो. एखाद्याला फाशीची शिक्षा द्यावी लागली ( गुन्ह्याप्रमाणें व कायद्यानुसार ) तरी ती तो देतो. त्याबद्दल त्याला पाप नाहीं लागत. तो त्यावेळीं आपलें कर्तव्यपालन करीत असतो.

अशारीतीनें कोणाचीही बाजू न घेतां कायद्याप्रमाणें जी योग्य शिक्षा असेल ती देणें हें त्याचें कर्तव्यच असतें. तें कर्तव्य पार पाडूनच त्याची सुटका !

गीतेंत या संबंधीं स्पष्ट आदेश देण्यांत आलेला आहे.

कर्तव्यश्चेद्धि कर्तव्य; संग्राम; स्वजनैरपि ।
निष्पक्षो निर्ममो भूत्वा न्यायाधिशासनस्थवत् ॥

या संसारांत नाना प्रकारच्या बंधनांनीं आपणास जखडून टाकलें आहे. त्यांतून ज्याला सुटका करून ध्यायची असेल त्यानें प्रत्येक कर्म, कौशल्यपूर्वक व यज्ञ भावनेनें पार पाडलें पाहिजे. ' योगः कर्मसु कौशलम्. ' जें आपण करूं तें चतुराइनें व कौशल्यपूर्वक करण्यासाठीं झटावयाचें. हा योग म्हणजे काय ? योग म्हणजे समभाव. ' समत्वं योग उच्यते. ' हें समत्व आपल्याठायीं बाणलें पाहिजे. आसक्ति बाळगायची नाहीं. फळाची इच्छा धरावयाची नाहीं. हें मी केलें. तें माझ्यामुळें पार पडलें हा अहंकार बाळगायचा नाहीं. जय, अपजय कोणतीही स्थिति वाट्यास येवो त्याबद्दल सुख–दुःख मानायचें नाहीं. समत्व सर्व बाबतींत समत्व. हा ममत्व सोडून समत्व बाळगण्याचा योग आपण साध्य करून घेतला पाहिजे. हा योग साधणें हेंच कर्मसंबंधी कौशल्य होय.

## यज्ञाचा अर्थ काय ?

यज्ञ म्हणजे काय ! तो कसा घडूं शकतो हें आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसऱ्यासाठीं वाट्यास येईल तो त्याग करण्याची तयारी, त्याचें नांव यज्ञ. तो कसा हंसत मुखानें !

अशा प्रकारच्या यज्ञानें तुमची व तुमच्याबरोबर इतरांचीही उन्नति होत असते. त्यात साऱ्यांचें कल्याण असतें. अशा यज्ञांत आपण सामील झालें पाहिजे. जें जें कांहीं करायचें तें भगवंताचें नांव घेऊन त्याच्यासाठींच करायचें. तें त्याला समर्पण. हीच आपल्या हातून घडणारी त्याची पूजा असें मनापासून मानावयाचें, अशा प्रकारच्या यज्ञ भावनेनें तुम्ही प्रत्येक कार्य करूं लागलां म्हणजे तें तुम्हांला बन्धनकारक होऊं शकत नाहीं तर तें मोक्षदायक ठरत असतें. ज्या कार्यांत ही यज्ञाची भावना नसते, तें कार्य मात्र तुम्हांला बंधनांत ढकलणारें होत असतें.

' तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर '

असें भगवंतानीं सांगितलें आहे. अशा रीतीनें कर्माचरण करणें हें सर्वतोपरी श्रेयस्कर आहे. अशारीतीनें जो कर्माचरण करीत नाहीं तो माया व मोहजालांत सांपडून घिरट्या खात रहातो. कर्माचरण हें सतत चालूच असतें त्याशिवाय कोणीही राहूं शकत नाहीं. कर्म न करण्यापेक्षां कर्म करीत रहाणें हा योग्य मार्ग. कांहीं कर्म करायचें नाहीं व सदैव विषयाचिंतनांत रहायचे हे अत्यंत हानीकारक आहे. मनावर पूर्ण ताबा

ठेवून वर सांगितल्याप्रमाणें कर्मयोगाचें अनासक्तपणें आचरण करीत रहाणें हेंच थोर पुरुषाचें लक्षण आहे.

**कौशलेन क्रिया कार्या यज्ञभावान्मुमुक्षुणा ।**
**मायाचक्रं विवर्तेत मायाक्रियं वियोजयेत् ॥**

**कर्मयोग व ज्ञानयोग :**

यानंतर प्रश्न असा उपस्थित होतो कीं, कर्मयोग व ज्ञानयोग यांचा एकमेकांशीं निकट संबंध आहे कीं नाहीं ते एकमेकास पोषक आहेत कीं नाहींत ? त्याचेंही उत्तर गीतेंत आहे.

**योगो ज्ञानेनस्याद् युक्तो ज्ञानं योगेनसंविशेत् ।**
**भूर्भुवोवच्च सर्वत्र प्रश्नात् तयोर्घ्यवस्थिति :॥**

योग ज्ञानानें व्यापलेला असूं शकतो व योगाच्या सहाय्यानें आपण ज्ञानांत प्रवेश करूं शकतो. भूलोक व अंतरिक्ष एकमेकास पूरक व सहाय्यभूत आहेत ना ? त्याचप्रमाणें ज्ञानयोग व कर्मयोग यांचा एकमेकांशीं अत्यंत निकट संबंध आहे. गीतेनें सांगितलेंच आहे कीं, 'एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति '

जो फलाच्या दृष्टीनें ज्ञानयोग व कर्मयोग हे एकच आहेत या भावनेने पहातो ती त्याची दृष्टि योग्य असते. या दोघांपैकीं कोणत्याही एकाचा आश्रय घेतला असतां दोघांचेहि फळ प्राप्त होतें. ज्ञानयोग व कर्मयोग हे एकमेकांपासून भिन्न आहेत असें मानणें चुकीचें आहे. विद्वान लोक त्यांना वेगवेगळे समजत नाहीत.

**परमात्म्याचें चिंतन**

जो निष्काम कर्मयोगाचे आचरण करतो त्याला अन्तःकरणशुद्धि आपोआप प्राप्त होंत असते. आणि अशा रीतीनें शुद्ध झालेल्या अंतःकरणात ज्ञानाचा प्रकाश आपोआप पडत असतो. 'योगो ज्ञानेन युक्तः स्यात' असें म्हटलें आहे तें योग्यच आहे.

परमात्मा हेंच सर्व गोष्टींचें व उद्योगाचें सारसर्वस्व आहे. ज्या या संसारांत आपण वावरत आहोंत तो संसार अनित्य असार व खऱ्या सुखापासून दूर नेणारा आहे. या संसारात तरायचें असल्यास सर्वांचें सारसर्वस्व जो परमात्मा त्याचें मनन चिंतन करणें हेंच आपलें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे. गीतेंत हेंच सांगण्यात आले आहे :—

**संस्मरन् सर्वसारं तं तदर्थं कर्म कल्पयन् ।**
**तदादर्शस्त्वमेवासि तस्यभावःस एव हि ॥**

सर्वसारभूत अशा परमात्म्याचें निरंतर चिंतन, जें कांही करावयाचें तें त्याच्या नांवें व त्याच्यासाठी प्रेमादरपूर्वक करावयाचें. हाच आपण आपला धर्म व हेंच कर्तव्यकर्म समजले पाहिजे. आपल्या समोर हाच कर्तव्याचा आदर्श सदैव असावा. परमात्म्याला जवळ करण्याचें हेंच तर साधन आहे. तें आपण आपलेसें करावयाचे आहेत.

मी पापी आहें. मार्ग चुकलेला आहे. भगवंताचें नामस्मरण करण्याचा मला अधिकार नाहीं. माझी लायकी नाहीं. असें समजूं नका. त्या विचारानीं निराश होऊं नका.

**पतितपावनः श्रीशः पीतः पत्रेऽपि पितृवत् ।**
**धर्म्यामृतेन खंसेव्यः सगुणो निर्गुणोऽपिसः ॥**

**शरण आलेल्यास मरण नाहीं**

कोणी कितीहि पतीत असो. त्याला पुण्यपावन करून घेणारा भगवान आहे. तो दयाळू आहे. तो कोणालाहि दूर लोटीत नाहीं. अत्यन्त हीन, दीन अशानाही त्यानें जवळ करून त्याना स्वतःमध्यें सामावून घेतलें आहे. कितीही पापकर्दमात लोळणारा असे ना का. तो जर मनोभावानें शरण आला तर भगवन्त त्याला कधीही दूर लोटणार नाहीं. मनुष्य कितीही पापी, दुराचारी असो. त्यानें अनन्य भावपूर्वक भगवंताचें चिंतन केलें असतां तो तत्काळ शुद्ध होऊं शकतो. 'अर्जुना ! तूं मुळीच शोक करीत बसूं नकोस. सर्व कांहीं सोडून तूं मला शरण ये. सर्व पापापासून मी तुझी मुक्तता करीन.

भगवान पतीतास पावन करून घेणारा व मायाळू आहे. सर्व प्राणीमात्रावर नव्हे तर अचेतन वस्तूवरही त्याचें अलोट प्रेम आहे. तो साऱ्या जगाचा जनक-पिता आहे. गीतेच्या बाराव्या अध्यायांत १३ ते १९ या श्लोकांत भक्ताचीं लक्षणें सांगण्यांत आलीं आहेत. ते गुण अंगीं बाणविण्याची आम्हीं पराकाष्ठा केली पाहिजे.

गीतेंत जीवात्म्याला क्षेत्रज्ञ व शरीराला क्षेत्र असें म्हटलें आहे. शरीर व संसार यांचें मूळभूत तत्व परब्रह्म हेंच आहे.

गीतेंत सूत्ररूपानें याची जाणीव करून देण्यांत आलेली आहे.

**शरीरं क्षेत्रमित्याहुर्ज्ञानं सत्त्व व्यवस्थितिः ।**
**मूलं ज्ञेयं परं ब्रह्म जन्माद्यस्य यतोऽन्वयात् ॥**

आपलें हें शरीर म्हणजे क्षेत्र आहे असें ज्ञानी पुरुष सांगतात. हें जाणणारा तो क्षेत्रज्ञ. या दोन्हीं गोष्टी ज्ञानाच्या सहाय्यानें संपादन करावयाच्या आहेत हें

ज्ञान झालें त्यासाठीं जरूर ती साधना केली म्हणजे सत्त्व गुणांचा लाभ होतो. सत्त्व-गुणांमुळें आपण काळोखांतून प्रकाशांत येतो.

### सर्वांचा आधार परब्रम्ह

या जगाचें आदिकारण किंवा मूळ म्हणजे परब्रम्ह. सर्वांचा आधार तोच परमात्मा. परमात्मा म्हणजे अमृत अमरत्व. ज्याची प्राप्ति झाली असतां दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत गोडी वाटत नाहीं.

**गुणार्हमम्बरं येन व्यावृतं वै तदमृतम् ।**
**यद् बुध्ध्या विरसं सर्वं येन स्यान्मधुरं मधु ॥**

जें आकाश पृथ्वी व सर्वत्र व्यापून राहिलें आहे त्या परब्रम्ह परमात्म्याला 'अमृत' ही संज्ञा देण्यांत आली आहे. जें जाणून घेतल्यानंतर इतर सर्व विषय निरस व निःसार वाटूं लागतात. सारा मध, सारी गोडी, सारा रस फक्त त्यांतच वाटूं लागतो असे तें मधूर अमृत आहे.

विषय हें विषासमान आहेत. ज्याला अमृत उपलब्ध झालें तो विषपान कशाला करील ! तो सदासर्वकाळ अमृताच्या महासागरांत पोहत राहणेंच पत्करील.

या जगांत ज्याला बंधनांत गुरफटून रहायचे असेल त्याच्यासाठीं मार्ग मोकळा आहे, त्याचप्रमाणें ज्याला मोक्षाच्या मार्गानें जायचें असेल त्यालाहि मार्ग मोकळा आहे. कोणत्या मार्गानें जायचें हें ज्याचें त्यानें ठरवायचें आहे.

**तपस्त्यागादिभिर्लिंगै मुक्ति मार्गः प्रतीयते ।**
**दम्भदर्पादिभिर्लिंगैर्बन्ध मार्गो न गम्यते ॥**

तप व त्यागादि आचरणांत आणल्यानें मोक्षमार्गाच्या वाटेनें आपण जाऊं लागतो तर दंभ, दर्प अहंकार यांचें आचरण केल्यानें आपण बंधनाच्या मार्गानें जाऊं शकतो. जो साधक आहे तो या मार्गानें कधींहि जाऊं इच्छिणार नाहीं.

### गीतामाईचा संदेश

आणि गीतामाईचा आपणास शेवटचा जो संदेश आहे त्याचेंही आपण चिंतन केलें पाहिजे.

**इत्थं हि साधु वर्तेथा यथा त्वां तु स्मरेद्धरिः ।**
**परित्यज्य प्रवृत्तिं वा सर्वदैकं हरिं स्मर ॥**

तुम्हीं आपलें वर्तन असें सच्छील, शुद्ध व निष्पाप ठेवा तसेंच साधु संतांना आप-लेसे करा कीं भगवंताला तुमची आठवण व्हावी. 'यो मद्भक्तः स मे प्रियः' असें


भगवंतानीच सांगितलें आहे. जो कोणी भक्तिभावपूर्वक त्याचें स्मरण करील त्याची आठवण त्याला झाल्याशिवाय कशी राहील ? दुसऱ्या कसल्याही मार्गे न लागतां, सर्व प्रवृत्तींचा त्याग करून सदासर्वकाल त्याचेच स्मरण करा. ' सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणंव्रज. ' भगवंताचें हें तुम्हाला सांगणें म्हणा वा आवाहन आहे. तें निष्ठापूर्वक स्वीकारून त्याचें आचरण केलेत तर तुम्ही सर्व बंधनांतून मुक्त व्हाल. तुम्हांला मग कसलीच यातायात करावी लागणार नाही

—' कल्याण ' मध्यें ( मे १९६५ ) प्रसिद्ध झालेल्या ' गीता-गुह्य ' या लेखाच्या आधारें साभार.

---


# जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

# गीताईचें दैनंदिन जीवनांतील महत्त्व

## गीतामृतरूपी दुग्ध

भगवद्‌गीतेंत अन्य पुष्कळ गोष्टी आहेत. या विश्वाची उत्पत्ति कशी झाली हा तत्त्वज्ञानांतील फार महत्त्वाचा प्रश्न होता. तत्संबंधीं गीतेपूर्वी अनेक ठिकाणीं विचार झाला होता, परंतु महामुनि कपिलप्रणीत सांख्यशास्त्रालाच सर्वांत अधिक मान होता. सांख्यशास्त्रानुसार प्रकृति व पुरुष हीं दोन तत्त्वें अनादि असून त्यांतूनच महत्, अहंकार, पंचतन्मात्रा अशा क्रमानें विश्व उत्क्रांत झाले. सांख्याप्रमाणेंच गीता मूळ पंचवीस तत्त्वें मानते, पण त्यांचें वर्गीकरण तिनें सांख्याहून भिन्न केलें आहे. त्याच-प्रमाणें प्रकृति व पुरुष ही दोन तत्त्वें सांख्याप्रमाणेंच गीतेनें अनादि मानली आहेत. परंतु तींच दोन तत्त्वें शेवटची व स्वतंत्र न मानतां एकाच परमात्म्याच्या त्या दोन विभूति आहेत असें सांगून, सांख्यशास्त्राचे सर्वस्वी अनुकरण केल्यानें स्वीकारावें लागणारें निरीश्वरवादित्व व द्वैत हीं दोनहि टाळून सांख्य नि अद्वैतवेदांत या दोहोंची गीतेनें सांगड घातली आहे. सृष्टिरचनेच्या या विचाराप्रमाणें आणखीहि कांहीं विषय गीतेंत चर्चिले गेले आहेत. चित्त शुद्ध होण्यासाठीं सांगितलेला राजयोगाचा विचार आहे; अव्यक्ताच्या उपासनेपेक्षा व्यक्ताची उपासना अधिक सुलभ असल्यानें परमेश्वरार्पणबुद्धीनें सर्व कर्मे करावींत असें सांगणारा भक्तियोग आहे; प्रकृतिभेदानुसार मानवांमध्यें निर्माण होणारा संपत्तिभेद सांगणारा दैवी व आसुरी संपत्तीचा विचार आहे; प्रकृति ही सत्त्व, रज नि तम अशी त्रिगुणात्मक असून त्या त्रिगुणांचा या सृष्टींत कसा विस्तार झाला आहे व त्यामुळें श्रद्धा, बल, बुद्धि, धृति, तप, दान, यांतहि कसें त्रिगुणात्मक वैचित्र्य निर्माण झालें आहे तें दाखविणारा विचार आहे; —अनेक गोष्टी आहेत. पण त्या सर्वांचा या मर्यादित जागेंत पुरेसा विस्तार करणें संपूर्णतः अशक्य आहे. शिवाय हे सर्व विषय आनुषंगिक आहेत. गीतेमध्यें ज्ञान व भक्ति यांचेसुद्धां जें विवेचन आलें आहे तें कर्मयोगाच्या अनुषंगानें आलें आहे. केवळ ज्ञानांतच गुंग होण्याचा वा भक्तींतच रंगून जाण्याचा उपदेश कोठेंच केलेला नाहीं. भक्ति ही सुलभ आहे, म्हणून सांगितली आहे. कारण जें बुद्धीला ग्रहण करण्याची शक्ति नसते तें श्रद्धाबलानें ग्रहण करतां येतें. पण अशा रीतीनें भक्तीचे श्रेष्ठत्व सांगत असतांहि ‘ माझें स्मरण करून तूं युद्ध कर ’ म्हणजेच कर्म कर, असें सांगितलें आहे. त्यचप्रमाणें ज्ञानाची गोष्ट आहे. ज्ञान होतांच कर्म सोडण्यासाठीं ज्ञान सांगितलेलें नाहीं तर ज्याप्रमाणें निष्कामबुद्धीनें कर्म केल्यानें कर्मांचीं बंधनें तुटतात त्याचप्रमाणें ज्ञानाच्या सहाय्यानें सर्व संशयांचे छेदन करून कर्मयोगाच।

आश्रय बुद्धिपुरस्सर नि ज्ञानपूर्वक करावा. यासाठीं ज्ञान सांगितलें आहे. भगवद्गीता ही मुख्यतः प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करण्यासाठीं सांगितलेली आहे. शकुनीच्या कपटद्युतामुळें अन्यायानें भाळीं आलेला बारा वर्षांचा खडतर वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास संपवून परत आल्यावरहि पांडवांना कौरवश्रेष्ठ दुर्योधन 'राज्यांतील त्यांचा वांटा द्यावयास तयार होईना, तेव्हां त्यांच्याशीं युद्ध करून आपला न्याय्य भाग मिळविण्यासाठीं पांडवांनीं कुरुक्षेत्राच्या रणांगणावर आपल्या सैन्याची व्यूह-रचना केली. परंतु केवळ नाशवंत ऐहिक वैभव मिळविण्यासाठीं आपल्याच आप्त-बांधवांना युद्धांत मारण्याच्या भीषण कल्पनेनें अर्जुनाच्या सात्त्विक मनावर विषादाचें पटल आलें आणि 'मला पूजार्ह असणाऱ्या भीष्मद्रोणांवर मी बाण कसे सोडूं?' असा प्रश्न करून तो रथामध्यें स्वस्थ बसला. विनाशी वैभव संपादण्यासाठी स्वतःच्या कुलाचा क्षय झालेला पाहण्यापेक्षां भिक्षा मागून उदरनिर्वाह करणें त्याला अधिक बरं वाटूं लागलें. एकंदर मानवी जीवनाकडे पाहण्याच्या विशिष्ट दृष्टिकोनांतून सामान्य व्यवहारांतील अडचणींच्या प्रसंगीं मनुष्याचे वर्तन कसें ठरत असतें, याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. परंतु भगवान श्रीकृष्णानें त्याचा तो निवृत्तिपर दृष्टिकोन घालवून त्याला प्रवृत्तिपर निष्काम कर्मयोगाचा उपदेश केला, आणि अर्जुनाच्या सर्व शंका दूर करून त्याला तें युद्ध स्वेच्छेनें व कर्तव्यबुद्धीनें करावयास लाविलें. कर्माकर्माच्या कोड्यांत सांपडून विमूढ झालेल्या अर्जुनानें केलेल्या शस्त्रसंन्यासांत गीतेचा उपक्रम झाला असून, सर्व व्यामोह नष्ट होऊन ज्ञानयुक्त कर्मयोगानें प्रेरित झालेल्या अर्जुनानें केलेल्या शस्त्रग्रहणांत गीतेचा उपसंहार झाला आहे. निवृत्तिपर दृष्टिकोनामुळें निर्माण झालेल्या कर्तव्यपराङ्मुखतेत गीतेचा आरंभ झाला असून, प्रवृत्तिपर दृष्टिकोनाचें ज्ञान झाल्यावर अंगिकारलेल्या कर्तव्यतत्परतेंत गीतेची समाप्ति झाली आहे!

श्रीमद्भगवद्गीता हें ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचें शास्त्र असून त्यांत वेदांत नि व्यवहार यांचा मेळ आहे, अभ्युदय नि निःश्रेयस यांचा संगम आहे, संसार नि परमार्थ यांचा समन्वय आहे. कर्म करावें तर बंधनांत सांपडावें लागतें, न करावें तर अनवस्था प्रसंग ओढवतो, केवळ 'तत्त्वमसि' एवढें महावाक्य ऐकतां क्षणींच सारे मायापाश झुगारून देऊन व देहभावनेचा त्याग करून मुक्त होणारे अलौकिक सामर्थ्याचे महापुरुष फार क्वचित जन्माला येतात. तेव्हां सामान्य जनांना प्रपंच साधून मोक्ष मिळविण्यासाठीं सहज सुलभ असा एखादा मार्ग दाखविणें अवश्य होतें. व तसा प्रयत्न उपनिषत्कालापासून चाललेला होता. अखेर निष्काम कर्मयोगाचा उपदेश करून गीतेनें ती अडचण दूर केली. वेदांतर्गत यज्ञयागप्रधान असा केवळ कर्मकांडात्मक मार्ग, उपनिषत्कालीन ज्ञानप्रधान कर्मसंन्यासपर मार्ग व गीतेमधील ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचा मार्ग अशी क्रमानें विकास पावत पावत, आर्यधर्माच्या तत्त्वज्ञानाची सोपानपरंपरा पूर्णावतार भगवान श्रीकृष्णानें सांगि-

# मुंबई ऑफिसांत हॉस्पिटल फंड जमा

१-१-६५ ते २१-५-६५ पर्यंत

| | | | रु. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. पी. डी. सॅमसन, | मुंबई | ५०१-० |
| २ | श्री. हनुमंतराव, आझाद विडी वर्क्स | ,, | ५००-० |
| १ | श्रीमती मायाबेन सी. परीख | ,, | १०० |
| २ | मे. गोल्ड सोप कं. | ,, | ९१ |
| ३ | साईभक्त दहाकडून | ,, | ६० |
| ४ | श्री सी. इ. माहिमकर ( ४ था हप्ता ) | ,, | ५० |
| ५ | श्रीमती पेरीन पी. सिधवा | ,, | ५० |
| ६ | ,, मेहरू पी. सिधवा | ,, | ५० |
| ७ | श्री. जी. एस. जोशी | ,, | २५-२५ |
| ८ | सौ. मनोरमा राऊत | ,, | २५ |
| ९ | श्री. एफ. एच. मुनशी | ,, | २२ |
| १० | ,, जी. के. रजपूत | ,, | २० |
| ११ | श्रीमती बी. वेंकटरम्मा | ,, | २० |
| १२ | श्री. पी. आर. जोशी | बालाघाट | ११ |
| १३ | मे. महाना अँ. कं. | पुणें | ११ |
| १४ | श्री. एस. बी. गोलतकर | मुंबई | ११ |
| १५ | कु. शशिकला के. पोतनीस | ,, | १० |
| १६ | श्री. जी. आर. भट | ,, | १० |
| १७ | श्रीमती शांतादेवी मल्लीनाथ | बंगलोर | १० |
| १८ | श्री. एम. जी. कुळकर्णी | मुंबई | १० |

---

तत्त्वें श्रीमद्भगवद्गीतेंत कशी पूर्णतेला पोहोचली, हें यावरून सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भगवद्गीता हें वैदिकधर्मवृक्षावरील पूर्ण विकसित झालेलें मधुर असें फल होय ! सकल उपनिषद्रूपी गाईचें दोहन करून भोक्ता वत्स अर्जुन याच्यासाठीं भगवान श्रीकृष्णांनी काढलेलें हें गीतामृतरूपी दुग्धच साऱ्या हिंदु समाजानें प्राशन करणें इष्ट आहे.

| | | |
|---|---|---|
| १९ ,, टी. जी. पाटील | नांदेड | १० |
| २० ,, एफ. आर. कारभारी | मुंबई | ६–२५ |
| २१ श्रीमती प्रमोदिनी पाटील | ,, | ६–२५ |
| २२ श्री. एस. पोतदार | ,, | ५ |
| २३ ,, पी. आर. प्रधान | अंधेरी | ५ |
| २४ ,, एम. जी. भट | मुंबई | ५ |
| २५ ,, एम. एम. कांबळी | ,, | ५ |
| २६ ,, के. डी. मेहता | ग्वालेर | ५ |
| २७ ,, सौ. शालिनाबाई ढापरे | फोणसा | ५ |
| २८ ,, श्री. एन. डी. दाजी | मुंबई | ५ |
| २९ ,, मे. विष्णू हॉल | ,, | ५० |
| ३० ,, रुपचंद जैन | ,, | २१ |
| ३१ ,, भा. मा. चौबळ<br>( स्व. सौ. कमळाबाई स्मरणार्थ ) | अंधेरी | ११ |

## चेकने आलेले

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भेंडा सुबय्याशेट्टी | अनंतपूर | १००० |
| २ श्री. के. एस. बुचीया | अलाहाबाद | १५०० |
| ३ मे. सीडणे आईस फॅक्टरी | मुंबई | ७०१ |
| ४ मेजर आर. बिंद्रा | मिरत | ५५० |
| ५ डॉ. होमी बांटलीवाला | मुंबई | ५२५ |
| ६ सौ. व्ही. सिकंड | दिल्ली | २७५ |
| ७ श्रीमती शरयु तळपदे | मुंबई | २०२ |
| ८ ,, वाय. व्ही. सुमथी | मंगलोर | १७५ |
| ९ ,, तारामती | मुंबई | १६० |
| १० ले. क. दयाशंकर | दिली | १५१ |
| ११ श्री. बी. बी. दवे | विलेपारले | १५१ |
| १२ सौ. अन्नपूर्णा एच. भट | गुजराथ | १५० |
| १३ श्री. एच. एन. पटेल | नैरोबी | ११० |
| १४ ,, रसिक शहा | मुंबई | ३३७ |
| १५ ,, एस. एन. श्रीनिवासन | सालेम | १०० |
| १६ ,, के. के. देसाई | बलसाड | १०१ |
| १७ ,, जी. एस. नारायणराव | हावेरी | ५१ |
| १८ ,, आर. एच. टीपणीस | हावेरी | ५५ |

| | | |
|---|---|---|
| १९ ,, एम. टी. प्रभाकर | कलकत्ता | ४०–७५ |
| २० ,, एन. ओ. शहा | कम्पाला | २४ |
| २१ ,, डॉ. चंपा आफळे | दिल्ली | १२ |
| २२ ,, श्री. यु. सी. परेख | पोरबंदर | २० |
| २३ ,, मेजर नायडू | दिल्ली | १५ |
| २४ ,, श्री. एच. एम. पटेल | मेहसाणा | ११ |
| २५ ,, आर. एच. शहा | बडोदा | ११ |
| २६ ,, पी. पी. देबारा | सिकंदराबाद | ११ |
| २७ ,, के. श्रीनिवासन | चेंबूर | १० |
| २८ ,, बी. जी. नोन्हाना | मद्रास | २० |
| २९ , व्ही. एस. राव | ,, | १५–४८ |
| ३० ,, एफ. आर. कारभारी | मुंबई | ६–५५ |
| ३१ ,, एस. डी. धारकर | चेंबूर | ५ |
| ३२ ,, के. आलागे | धारवाड | ५ |
| ३३ ,, एन. डी. दाजी | मुंबई | ५ |

### ब्रिटीश पो. ऑर्डरनें आलेल्या

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती सावित्री बी. के. पटेल | लंडन | १३२–५१ |
| २ श्री. एस. एम. पाटील | झंबिया | १३२–५० |
| ३ ,, एम. एन. मलेट्टी | MGOMEN | ९२–७५ |
| ४ ,, एम. व्ही. अढिया | मोरोगोरो | ६६–३३ |
| ५ ,, श्रीमती व्ही. बेगापुडी | लागोस | ५३--०० |
| ६ ,, गुलशान ह. माई | कम्पाला | ४७--८३ |
| ७ ,, आय. बी. परेख | कुसंडी | ३३--१२ |
| ८ ,, ए. सी. पटेल | ल्युटन | २६--५० |
| ९ ,, जे. एम. पटेल | लुआनशा | २५--५० |
| १० ,, एम. व्ही. राजा | सॅलतबरी | १३--११ |
| ११ ,, मे. डी. गोपालन ॲ. सन्स | हिलब्रा | १३--२५ |
| १२ ,, श्री. एन. राघवन | बाहेरीन | १३–२५ |
| १३ ,, बी. जे. देसाई | दारेसलाम | १३--५५ |
| १४ ,, बाबू | मस्कत | १३- २५ |
| १५ ,, एम. एम. भट | नैरोबी | १३-- २५ |
| १६ ,, आर. बी. एफ. ए. | — | ९--२५ |

# अखिलभारतीय साई भक्तांचा मद्रास येथें भरलेला १० वा मेळावा

मे ८ ते १० सन १९६५ रोजीं मद्रास येथें मैलापूर भागांत ऑल इंडीया साई समाजाचे जागेंत अखिल भारतीय साई भक्तांचा मेळावा भरला होता. त्यास बरेच प्रतिनिधी हजर होते. अध्यक्षस्थानीं स्वामी साई पादानंद श्री राधाकृष्ण स्वामी बंगलोर हे होते व बाबांच्या १० वर्षे सहवास केलेले इंदूरचे रिटायर्ड जज्ज श्री. रेगे व श्री. बशीर बाबा प्रमुख पाहुणे होते. श्री. रेगे यांचे वय ७५ असतांना ते तरुणाचे उत्साहानें बाबांच्या लीला भक्तांना सांगत व गुरुची कांस कोणत्याही परिस्थितींत न सोडण्याबद्दल सांगत. तरच ध्येय साध्य होईल. तरुण बशीर बाबांनी तेलगुंत दि. १० रोजी बाबांचा महिमा वर्णन केला व सर्व धर्मांचा मार्ग एकच ठिकाणीं जातो असें प्रतिपादिलें.

दिवंगत श्री नरसिंह स्वामींच्या प्रेरणेनें हा मेळावा जमला. त्यांत सर्व धर्मांची मूळभूत एक वाक्यता प्रतिपादन केली गेली. अखिल भारत साई समाजाची स्थापना श्री नरसिंह स्वामीनीच केली व बाबांचा प्रचार भारतभर केला.

सुरवातीचे भाषण श्री. जस्टिस् के. एस. वेंकटरमण यांचे झाले व ' संत " व धर्म यावर वक्त्यांची भाषणें विचार परिप्लुत झाली. श्री. वेंकटरमण यांनीं ध्यानानें ईश्वर प्रसन्न व साध्य होतो असें प्रतिपादिलें. मग तुमचा व्यवसाय व धर्म कोणताही असो.

स्वागत कमिटीचे चेअरमन श्री. रामस्वामी व अखिल भारतीय साई समाजाचे अध्यक्ष श्री. डी. भीमराव यांनी प्रतिनिधींचें स्वागत केलें. स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांनीं बाबांचा प्रचार कोना कोपऱ्यांत पोचविण्यास प्रतिनिधींना आव्हान केले.

खालील ठराव मुख्य अधिवेशनांत पास करण्यांत आलेः—

१ दिवंगत श्री. नरसिंह स्वामींनीं अखिल भारतीय साई समाज स्थापन करून व भारतभर व्याख्यानें देऊन व मेळावे भरून श्री. साईबाबांचा प्रचार केला त्या कार्यांचे भक्ती युक्त व निष्ठापूर्वक स्मरण व दाखला ही सभा ठेवीत आहे.

२. ३. अखिल भारतीय साई समाजानें इतर साई समाज जोडण्यास आव्हान करावें व
४. ५. जात, प्रांत, धर्म न सोडतां वैचित्र्यांत एकता पाहण्याचा प्रचार करावा. तसेंच ध्यानासाठी प्रत्येक मंदिरांत एक खोली स्वतंत्र ठेवावी. व सर्वजाती, पंथ, धर्म, रंग यांचे समीकरण करावें

६. ७. प्रत्येक भक्तानें प्रचार करून समाजाचे अध्यक्ष व अधिकाऱ्यांस मदत करावी.




## "मे" १९६५

चालू महिन्यांत भक्तांची गर्दी मे महिन्याचे सुट्टीमुळें शिर्डीस पुष्कळच होती. प्रत्येक गुरुवार व रविवार तुफान गर्दी भक्तांची होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती येणें प्रमाणें.

**कीर्तन**

संस्थान गवई यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. विमलताई भाऊसाहेब राजेशिर्के जळगांव पु. खा. श्री. बाळकृष्ण पांडुरंग सीनगारे मु. भिवंडी (ठाणे) श्री. तानाजी मालवणकर (गायन) ऑर्केस्ट्रा वादन नृत्य श्री. नानू माई डी. देसाई (नवसारी) गुजराथप्रांत श्री. वसंत परशुराम पंढरपूरकर मुख्याध्यापक कानापुर पंढरपूर श्री. संध्या दिनकर नाईक मु. इंदोर (मध्यप्रदेश) श्री. कमलम्मा रायपूरकर मु. रायपूर (म्हैसूरप्रांत) श्री. दत्तात्रय नारायण नाडकर्णी दत्तगायन विद्यालय गिरगांव मुंबई.

**भजन**

श्री. लक्ष्मण नारायण गावडे विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ न्यू कोळीवाडा सांताक्रुझ मुंबई.

---

व श्री. नरसिंह स्वामींची तसबीर शिर्डी साई मंदिरात लावणेची खटपट करावी.

८. ९. अखिल भारतीय साई समाजाचे आवारांत पोष्ट ऑफीस उघडणेची खटपट करावी. व अध्यक्षांनी या ठरावाची पुर्तता करावी.

—अखिल भारतीय साई समाजाचे चिटणीसाकडून

---

**सतारवादन**

श्री. गोविंद गणेश कुलकर्णी होम सायन्स कॉलेज जबलपूर.

**नवीन उपक्रमप्रथा**

मे. सन्माननीय कोर्ट रिसीव्हर पोतनीस साहेब यांनीं महिन्यांतून एक दिवस साई संस्थान शिर्डी नोकर भजनी मंडळ स्थापन केलें. त्याप्रमाणें एका गुरुवारीं सर्व संस्थान नोकरांनीं श्रीपुढें भजन केलें. अशी प्रथा कायम चालू रहाणार आहे.

**मोठ्यांच्या भेटी**

मे. ठिगळे साहेब डेपोटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन पुणें.

मे. व्ही. एस. गोपालन डेपोटी सेक्रेटरी रुलर डिपार्टमेंट महाराष्ट्र मुंबई.

मे. डॉ. एम. चेन्नारेड्डी मिनिस्टर फॉर फायनन्स अँड. इंडस्ट्रीज आंध्र राज्य.

मे. एस. पी. मेहता डेपोटी कलेक्टर नांदेड ( मराठवाडा )

मे. के. आर. अय्यर सचिवालय बॉम्बे.

मे. डी. पी. देसाई ॲडिशनल सिटी सेशन जज्ज भद्र अहमदाबाद गुजराथ राज्य.

**हवापाणी**

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.



## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– | | by Pradhan | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाण कर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1–00** |
| (2) | ,, ,, ,, $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | **00–37** |
| (3) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | **00–50** |

Other different poses of Sai Baba in colour according to. different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : वी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.